# महात्मा फुले कृषि विद्यापीठ

ऑगस्ट
२०२४

# ई वार्ता




N

LEGEND

| | | |
|---|---|---|
| ■ | Central Campus of MPKV | |
| ● | Agril. Research Station | 27 |
| ★ | Post Graduate Institute | 01 |
| ✿ | Agril. Technology Information Centre | 01 |
| ⚘ | Regional Extension Centre | 04 |
| ✹ | District Extension Centre | 05 |
| ❄ | Krishi Vigyan Kendra | 04 |
| ✖ | Agricultural Tech. School | 08 |
| ❂ | Agricultural Engg. College | 02 |
| ✡ | Agricultural College | 08 |
| ⁝ | Horticulture College | 02 |
| © | ABM College -1 | 01 |
| @ | Food Technology College - 1 | 01 |
| # | Agriculture Polytechnic College - 1 | 01 |

मफुकृवि विस्तार प्रकाशन क्र. २७५२/२०२४

मफुकृवि ई वार्ता
ऑगस्ट २०२४
महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी MAHATMA PHULE KRISHI VIDYAPEETH, RAHURI अन्नं बहु कुर्वीत तद् व्रतम् 1969
वर्ष :४, अंक क्रं. : ४४, ऑगस्ट, २०२४ महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी

## मा. पंतप्रधानांच्या शुभहस्ते महात्मा फुले कृषि विद्यापीठाचा तुरीचा फुले पल्लवी आणि चारधारी वालाचा फुले श्रावणी या वाणांचे शेतकऱ्यांसाठी लोकार्पण

### फुले पल्लवी





### फुले श्रावणी





**दि. १२ ऑगस्ट, २०२४.** महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी अंतर्गत कार्यरत असलेल्या कडधान्य सुधार प्रकल्पाने विकसीत केलेला तुरीचा वाण फुले पल्लवी (फुले तुर १२–१९–२) आणि क्षमता असणाऱ्या पिकावरील संशोधन प्रकल्पाने विकसीत केलेला चारधारी वालाचा वाण फुले श्रावणी (पी.डब्ल्यु.बी. १७–१८) मा. पंतप्रधान श्री नरेद्र मोदी यांचे शुभहस्ते राष्ट्राला अर्पण करण्यात आला. नवी दिल्ली येथील भारतीय कृषि संशोधन संस्थेच्या (पुसा) प्रक्षेत्रावर मा. पंतप्रधानाच्या शुभहस्ते हा लोकार्पण कार्यक्रम संपन्न झाला. याप्रसंगी ६१ पिकांच्या १०९ वाणांचे लोकार्पण करण्यात आले. यामघ्ये ३४ शेतपिकांचा आणि ७२ बागायती उद्यानविद्या पिकांचा सामावेश आहे. महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. पी.जी. पाटील यांचे नेतृत्वात आणि माजी संशोधन संचालक डॉ. सुनिल गोरंटीवार, विद्यमान संशोधन संचालक डॉ. विठ्ठल शिर्के यांचे मार्गदर्शनाखाली राहुरी येथील कडधान्य सुधार प्रकल्प येथून विकसीत झालेल्या दोन वाणांचा समावेश होता.

तुरीचा फुले पल्लवी हा वाण मध्यम पक्वता कालावधी (१५७ ते १५९ दिवस) असुन देशाच्या मध्य भारतातील महाराष्ट्र, मध्यप्रदेश, छत्तीसगड आणि गुजरात या राज्यात बागायत आणि जिरायत क्षेत्रासाठी लागवडीकरीता शिफारस करण्यात आली आहे. या वाणापासुन प्रति हेक्टरी २१.४५ क्विंटल सरासरी उत्पादन मिळते. दाणे टपोरे फिकट तपकिरी रंगाचे आहेत. मर व वांझ या तुर पिकातील प्रमुख रोगांना हा वाण मध्यम प्रतिकारक्षम असून शेंगा पोखरणारी अळी आणि शेंगमाशी या किडींना कमी बळी पडतो. तसेच चारधारी वालाचा वाण फुले श्रावणी (पी.डब्ल्यु.बी. १७–१८) हा वाण बागायती उत्तम पाण्याचा निचरा होणाऱ्या क्षेत्रासाठी विकसीत केलेला आहे. हा वाण अधिक उत्पादनक्षम असुन हिरव्या शेंगाचे प्रति हेक्टरी १४२.९६ क्विंटल उत्पादन मिळते तर वाळलेल्या दाण्यांचे प्रति हेक्टरी १३.८१ क्विंटल उत्पादन मिळते. या वाणामध्ये प्रथिनांचे प्रमाण २४.९५ टक्के आहे. या वाणावर किडी आणि रोगांचा प्रादुर्भाव आढळुन आला नाही.

फुले पल्लवी हा वाण विकसीत करण्यामध्ये कडधान्य प्रकल्पाकडील वरिष्ठ शास्त्रज्ञ डॉ. एन.एस. कुटे, डॉ. व्ही.एम. कुलकर्णी, श्री. वाय.आर. पवार, डॉ. व्ही.ए. चव्हाण, डॉ. सी.बी. वायळ आणि श्री. वसंत भोजने यांचे महत्वपूर्ण योगदान आहे. तसेच वालाचा वाण विकसीत करण्यामध्ये क्षमता असणाऱ्या पिकावरील संशोधन प्रकल्पाकडील पीक पैदासकार डॉ. एम. टी. भिंगारदे, डॉ. सुरेश दोडके, डॉ. वाय.जी. बन, श्री. बी.आर. अडसुरे आणि श्री. एस.एस. वेताळ यांचे महत्वपूर्ण योगदान आहे.

मफुकृवि ई वार्ता
ऑगस्ट २०२४

वर्ष :४, अंक क्रं. : ४४, ऑगस्ट, २०२४ महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी

## कृषि विज्ञान केंद्र, ममुराबाद, जि. जळगाव येथे मा. केंद्रीय कृषि मंत्र्यांची भेट






**दि. १० सप्टेंबर, २०२४.** महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी अंतर्गत असलेल्या कृषि विज्ञान केंद्र, ममुराबाद फार्म, जि. जळगाव येथे केंद्रीय कृषिमंत्री मा. ना. श्री. शिवराज सिंह चौहान यांनी भेट दिली. यावेळी जळगाव विधानसभा मतदारसंघाचे आमदार मा. श्री. सुरेश भोळे, अटारी पुण्याचे शास्त्रज्ञ डॉ. तुषार आठरे, डॉ. टी. राजेश उपस्थित होते. यावेळी मार्गदर्शन करतांना मा.ना.श्री. शिवराज सिंह चौहान म्हणाले की भारत सरकारच्या किसान सन्माननिधीच्या एक रुपयातील पीक विमा माननीय प्रधानमंत्री मूल्यवर्धित योजना अशा शेती व शेतकरी कल्याणाच्या अनेक योजना शेतकऱ्यांसाठी राबविल्या जात आहेत. शेतकऱ्यांनी मांडलेल्या प्रश्नांवरती नक्कीच गांभीर्याने काम केले जाईल. यापुढे प्रत्येक श्वास शेतकऱ्यांसाठी काम करणार आहे. कृषि विज्ञान केंद्राने नवनवीन तंत्रज्ञान, नवनवीन पिके, नवनवीन वाण व मूल्यवर्धन अशा तंत्रज्ञानाचा प्रचार व प्रसार प्रभावीपणे करावा, त्याचबरोबर कृषि विज्ञान केंद्राने शेतकऱ्यांना विज्ञानाशी जोडण्याचे कार्य प्रभावीपणे करावे. या भेटीचे वेळी कृषिमंत्र्यांनी कृषि विज्ञान केंद्राच्या फार्मवरील सोयाबीन, तूर, मूग, उडीद, बांबू पोषण, परसबाग प्रात्यक्षिके, शेतकरी निवास व विविध प्रत्यक्ष युनिट आदींना भेटी देऊन शास्त्रज्ञांशी संवाद साधला. यावेळी कृषि विज्ञान केंद्राने आयोजित केलेल्या प्रदर्शनीमधील जळगाव जिल्ह्यातील केळी, कापूस, मोसंबी, झेंडू, शेवंती, निशिगंध, पानवेल, काकडी, मिरची, टोमॅटो, कारली व मोह मूल्यवर्धन तसेच शेतकऱ्यांनी उत्पादित केलेले उत्पादने केळी तसेच मिलेट मूल्यवर्धित उत्पादने व कृषि विज्ञान केंद्रातील विविध कृषि यंत्रे, अवजारांच्या प्रदर्शनीला त्यांनी भेट देऊन सविस्तरपणे माहिती घेतली. त्यानंतर कृषि विज्ञान केंद्राच्या विविध कार्यक्रमांचे लाभार्थी शेतकऱ्यांशी त्यांनी संवाद साधला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक कृषि विज्ञान केंद्राचे कार्यक्रम समन्वयक डॉ. हेमंत बाहेती यांनी केले. श्री. किरण जाधव यांनी सूत्रसंचालन केले. या कार्यक्रमासाठी परिसरातील १५० पेक्षा जास्त शेतकरी उपस्थित होते.

## महात्मा फुले कृषि विद्यापीठात देशाचा ७८ वा स्वातंत्र्य दिन उत्साहात संपन्न

**दि. १५ ऑगस्ट, २०२४.** महात्मा फुले कृषि विद्यापीठामध्ये देशाचा ७८ वा स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी कुलगुरु डॉ. पी. जी. पाटील यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी अधिष्ठाता डॉ. दिलीप पवार, कुलसचिव श्री. अरुण आनंदकर, संशोधन संचालक डॉ. विठ्ठल शिर्के, विस्तार शिक्षण संचालक डॉ. गोरक्ष ससाणे, पदव्युत्तर महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. साताप्पा खरबडे, प्रभारी नियंत्रक डॉ. भरत पाटील, विद्यापीठ अभियंता श्री. मिलिंद ढोके, प्रमुख शास्त्रज्ञ बियाणे डॉ. आनंद सोळंके, सर्व विभाग प्रमुख, एनसीसी अधिकारी लेफ्ट. डॉ. सुनील फुलसावंगे व सुरक्षा अधिकारी श्री. गोरक्ष शेटे उपस्थित होते. यावेळी कुलगुरु डॉ. पी.जी. पाटील आपल्या भाषणात म्हणाले की विद्यापीठ स्थापनेपासून गेल्या ५६ वर्षामध्ये महात्मा फुले कृषि विद्यापीठाने शेतकऱ्यांसाठी विविध पिकांचे ३०० पेक्षा जास्त वाण प्रसारीत करुन देशामधील इतर कृषि विद्यापीठांच्या तुलनेत उत्कृष्ट कामगिरी केली आहे. शिक्षण, संशोधन व विस्तार शिक्षण या तीनही विभागात हे विद्यापीठ चांगली कामगिरी करत आहे. नवी दिल्ली येथे पंतप्रधानांच्या शुभहस्ते विविध पिकांचे १०९ जैवसंवर्धीत वाण देशाला अर्पण करण्यात आले. त्यामध्ये विद्यापीठाचे तूर या पिकाचा फुले पल्लवी व चारधारी वाल फुले श्रावणी या दोन वाणांचा समावेश आहे. पुणे कृषि महाविद्यालयातील देशी गाय संवर्धन प्रकल्पासाठी शासनाने भरीत तरतुद केल्यामुळे देशी गाय संवर्धन व संशोधनास गती मिळणार आहे. या कार्यक्रमानंतर विद्यापीठाच्या मध्यवर्ती परिसरातील प्रक्षेत्रावर वनमहोत्सव कार्यक्रम २०२४ चे आयोजन करण्यात आले होते. पदव्युत्तर महाविद्यालयाच्या वसतीगृहमागील उद्यानविद्या प्रक्षेत्र व बियाणे विभागाचा ब गट या दोन ठिकाणी केशर आंब्याची ५०० व जांभळाची

वर्ष :४, अंक क्रं. : ४३, जुलै, २०२४ महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी





१०० कलमांचे वृक्षारोपण विद्यापीठातील अधिकारी व कर्मचारी यांच्या हस्ते करण्यात आले. या वृक्षारोपण कार्यक्रमाचे नियोजन डॉ. आनंद सोळंके, डॉ. भरत पाटील, डॉ. दत्तात्रय पाचारणे, डॉ. गोकुळ वामन, डॉ. सचिन मगर व श्री. बुवासाहेब म्हस्के यांनी केले. यावेळी डॉ. अण्णासाहेब शिंदे कृषि अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालयात रक्तदान शिबिराचेही आयोजन राष्ट्रीय सेवा योजनेचे संचालक डॉ. महावीरसिंग चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले होते. याप्रसंगी विद्यापीठातील अधिकारी व कर्मचारी तसेच विद्यार्थी, विद्यार्थिनी यांनी रक्तदान शिबिरामध्ये मोठ्या संख्येने सहभाग नोंदविला. लेफ्ट. डॉ. सुनील फुलसावंगे यांनी परेडचे संचालन केले. सुरक्षा अधिकारी श्री. गोरक्ष शेटे यांनी सूत्रसंचालन केले. यावेळी अधिकारी, कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## कृषि महाविद्यालय, पुणे येथे साखर व संलग्न उद्योग परिषद २०२४ चे आयोजन




**दि. ८ ऑगस्ट, २०२४.** महात्मा फुले कृषि विद्यापीठ अंतर्गत कृषि महाविद्यालय, पुणे, मिटकॉन कन्सल्टन्सी ॲण्ड इंजिनियरिंग सर्विसेस लि. पुणे, साखर आयुक्तालय, पुणे आणि दि एन्व्हाएरमेंट असोसिएशन ऑफ महाराष्ट्र, कोल्हापूर यांच्या संयुक्त विद्यमाने साखर व संलग्न उद्योगांचे चक्रीय अर्थव्यवस्था आणि पर्यावरणपूरक शाश्वततेसाठी राज्यस्तरीय दोन दिवसीय साखर व संलग्न उद्योग परिषद २०२४ चे आयोजन कृषि महाविद्यालय, पुणे येथील डॉ. शिरनामे सभागृहात आयोजन करण्यात आले होते. या परिषदेच्या उद्घाटनप्रसंगी अध्यक्षस्थानी महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. पी.जी. पाटील होते. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणुन राज्याचे साखर आयुक्त डॉ. कुणाल खेमनार उपस्थित होते. याप्रसंगी व्यासपीठावर प्रमुख उपस्थितीमध्ये पुणे येथील मिटकॉनचे कार्यकारी संचालक श्री. आनंद चलवादे, सोलापूर येथील जकराया शुगर लि.चे चेअरमन ॲड. बी. बी. जाधव, सांगली येथील सद्गुरु श्री श्री साखर कारखाना लि.चे चेअरमन श्री. एन. शेशागिरी नारा, कोल्हापूर येथील दि एन्व्हाएरमेंट असोसिएशन ऑफ महाराष्ट्राचे अध्यक्ष श्री. जितेंद्र माने देशमुख, भारत सरकारच्या पर्यावरण समितीचे सदस्य डॉ. एस. व्ही. पाटील, कृषि विद्यापीठाचे संशोधन संचालक डॉ. विठ्ठल शिर्के, कृषि महाविद्यालय पुणेचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. महानंद माने,पुणे येथील विस्माचे कार्यकारी संचालक श्री. अजित चौगुले आणि पर्यावरण समितीचे सदस्य श्री राहुल मुंगीकर उपस्थित होते.

यावेळी कुलगुरू डॉ. पी. जी. पाटील म्हणाले की राज्यातील साखर आणि संलग्न उद्योग पर्यावरणीय प्रश्नांच्या अनुषंगाने विशिष्ट संक्रमणातून जात आहेत तसेच जागतिक हवामान बदल, अतिपाणी आणि अमर्यादित रासायनिक खतांच्या वापरामुळे जमिनीचे खालवलेले आरोग्य, वाढता उत्पादन खर्च, मजुरांची कमतरता, कमी उतारा अशा आव्हानांना ऊस उत्पादक सामोरे जात आहेत. या आव्हानांना सामोरे जाण्यासाठी पर्यावरण पूरक तंत्रज्ञानाचा प्रसार व प्रचार साखर उद्योगांमार्फत शेतकऱ्यांपर्यंत व्हावा. ऊस संशोधनामध्ये कृषि विद्यापीठाच्या पाडेगाव ऊस संशोधन केंद्राचे मोठे योगदान आहे. यावेळी साखर आयुक्त डॉ. कुणाल खेमनार आपल्या प्रमुख मार्गदर्शनात म्हणाले की राज्याच्या अर्थकारण, राजकारण, समाजकारण आणि संस्कृतीमध्ये साखर कारखान्यांचा मोठा वाटा आहे. सर्व साखर कारखान्यांनी पर्यावरणपूरक कामे करण्यासाठी शासनाने विविध धोरणे आखलेली आहेत. साखर कारखान्यांनी मूल्यवर्धित उत्पादनांवर अधिक काम करणे गरजेचे आहे. साखर कारखान्यांना कॉम्प्रेस बायोगॅस आणि ग्रीन हायड्रोजनसाठी मोठी संधी उपलब्ध आहे. याप्रसंगी महात्मा फुले कृषि विद्यापीठाचा जकराया शुगर लि. या कारखान्याशी पर्यावरणपूरक ऊस उत्पादनासाठी व कार्बन क्रेडीटसाठी आणि सद्‌गुरु श्री श्री साखर कारखाना यांच्याबरोबर पर्यावरणपूरक शाश्वत ऊस उत्पादन तंत्रज्ञान विस्तारासाठी सामंजस्य करार करण्यात आले. या सामंजस्य करारावर कृषि विद्यापीठाचे संचालक संशोधन डॉ. विठ्ठल शिर्के आणि कारखान्याचे चेअरमन श्री. सचिन जाधव, श्री. एन. शेशागिरी नारा यांनी स्वाक्षऱ्या केल्या. या कार्यक्रमाचे स्वागत व प्रास्ताविक डॉ. महानंद माने यांनी केले तर सामंजस्य कराराचे वाचन डॉ. धर्मेंद्रकुमार फाळके यांनी केले.

मिटकॉनचे श्री. आनंद सरोदे यांनी जागतिक हवामान बदलाचे पर्यावरणावर होणारे परिणाम यावर सादरीकरण दिले. याप्रसंगी डॉ. बी.बी. जाधव, श्री. शेषागिरी नारा, श्री. राहुल मुंगीकर, श्री. एस. व्ही. पाटील, श्री. अजित चौगुले, श्री. जितेंद्र माने देशमुख, डॉ. विठ्ठल शिर्के यांनी आपले मनोगत व्यक्त केले. दोन दिवस चालणाऱ्या या परिषदेमध्ये एकुण सहा सत्रांमध्ये हवामान बदल आणि शाश्वतता, चक्रीय अर्थव्यवस्था, साखर आणि संबंधीत उद्योगातील प्रदुषण नियंत्रण कल व पर्यावरण संरक्षणासंबंधी सिंहावलोकन या विषयांवर चर्चासत्रांचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. महानंद माने व डॉ. धर्मेंद्रकुमार फाळके यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. पल्लवी सुर्यवंशी यांनी तर आभार डॉ. संदिप जाधव यांनी मानले. या दोन दिवसीय परिषदेसाठी राज्यातील साखर कारखान्यांचे पर्यावरण अधिकारी, चीफ केमिस्ट, प्रदुषण विभागाचे तज्ञ आणि विद्यापीठाचे शास्त्रज्ञ उपस्थित होते.

## कृषि महाविद्यालय, पुणे येथे दोन दिवसीय साखर व संलग्न उद्योग परिषद संपन्न




**दि. ९ ऑगस्ट २०२४.** महात्मा फुले कृषि विद्यापीठ अंतर्गत कृषि महाविद्यालय, पुणे, मिटकॉन कन्सल्टन्सी ॲण्ड इंजिनियरिंग सर्विसेस लि. पुणे, साखर आयुक्तालय, पुणे आणि दि एन्व्हाएरमेंट असोसिएशन ऑफ महाराष्ट्र, कोल्हापूर यांच्या संयुक्त विद्यमाने साखर व संलग्न उद्योगांचे चक्रीय अर्थव्यवस्था आणि पर्यावरणपूरक शाश्वततेसाठी राज्यस्तरीय दोन दिवसीय साखर व संलग्न उद्योग परिषद २०२४ चा सांगता समारंभ पार पडला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. पी.जी. पाटील होते. यावेळी कुलगुरू डॉ. पी.जी. पाटील अध्यक्षीय मार्गदर्शन करतांना म्हणाले की साखर व संलग्न उद्योगातील शास्त्रीय माहिती, तंत्रज्ञान व पर्यावरण संरक्षण या बाबतीत विचारांची देवाणघेवाण करण्यासाठी साखर परिषदेच्या माध्यमातून घडलेले विचारमंथन निश्चितच मार्गदर्शक ठरेल. ही परिषद सुनियोजित पद्धतीने पार पडली, त्यातील सर्व विषय संयुक्तिक आणि महत्त्वाचे होते. पर्यावरण संरक्षण हे आपले सामुहिक कर्तव्य आहे, म्हणून सहकार्य आणि समन्वयातून कार्य केले पाहिजे.

दोन दिवसांच्या या परिषदेच्या कालावधीत एकूण सहा सत्रामध्ये विविध विषयांवरील व्याख्याने आयोजित करण्यात आली होती. द्वितीय सत्रात हवामान बदल आणि शाश्वतता अंतर्गत कार्बन फुटप्रिंट: साखर आणि संबंधित उद्योगांमध्ये निव्वळ शून्य उत्सर्जन गाठण्यासाठीची पावले या विषयावर मिटकॉनचे सहाय्यक उपाध्यक्ष श्री. धवल मरघडे यांनी यशोगाथा–मूल्यवर्धित उत्पादन म्हणून बायो–सीएनजीद्वारे चक्रीय बायो–इकॉनोमी या विषयावर, श्रीनाथ म्हस्कोबा साखर कारखाना लि. दौंडचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. डी.एम. रासकर आणि कार्बन डायऑक्साईड व्हॅलोरायझेशन आणि ग्रीन केमिस्ट्री या विषयावर पुणे मिटकॉनचे संचालक श्री. राहुल वैद्य यांची व्याख्याने झाली. तिसऱ्या सत्रात चक्रीय अर्थव्यवस्था अंतर्गत मोलॅसेसपासुन पोटॅश निर्मिती: डिस्टिलरी लिक्विड वेस्टमधून मीठ पुनर्प्राप्ती या विषयावर केम प्रोसेस सिस्टम्स प्रा. लि.चे अहमदाबाद, गुजरात संस्थापक अध्यक्ष श्री. जयेश पारिख, चक्रीय अर्थव्यवस्था पर्यावरणपूरक व शाश्वत ऊस उत्पादन वाढीसाठी व जमीन आरोग्यासाठी ऊस शेतीतील व साखर कारखान्यातील टाकाऊ पदार्थांचे मूलस्थानी व्यवस्थापन या विषयावर कृ.म.वि., पुणे येथील राजीव गांधी विज्ञान व तंत्रज्ञान प्रकल्पाचे प्रमुख शास्त्रज्ञ डॉ. धर्मेंद्रकुमार फाळके, साखर व संलग्न उद्योगातील शाश्वत विकासासाठी हरित तंत्रज्ञान या विषयावर पुणे केमडिस्ट ग्रुपचे संचालक डॉ. सुनील ढोले आणि आसवानी प्रकल्पातून मूल्यवर्धित उत्पादन: जकराया साखर कारखाना यशोगाथा या विषयावर जकराया साखर कारखाना लि. सोलापूरचे कार्यकारी संचालक श्री. सचिन जाधव यांची व्याख्याने पार पडली.

दुसऱ्या दिवशी चौथ्या सत्रात पर्यावरण संरक्षण सिंहावलोकन अंतर्गत अनुपालनाच्या दृष्टिकोनातून हरितपट्ट्याचा विकास व सी. इ. आर. कंम्लायन्स या विषयावर पर्यावरण मूल्यांकन समितीचे सदस्य डॉ. राहुल मुंगीकर, पर्यावरण, वन व हवामान बदल, सौर एकीकरण: अंमलबजावणी आव्हाने या विषयावर पुणे, मिटकॉनचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. हर्षद जोशी आणि राज्यातील साखर कारखान्यांमध्ये सौर ऊर्जा प्रकल्प उभारणी या विषयावर मुंबई महाप्रीईतचे संचालक श्री. दिपक कोकाटे यांची व्याख्याने पार पडली. पाचव्या सत्रातील व्याख्यानात साखर व संबंधित उद्योगातील प्रदुषण नियंत्रण कल अंतर्गत स्पेंटवॉश प्रक्रियेकरीता उदयोन्मुख तंत्रज्ञानाची उपलब्धता या विषयावर भारत सरकारच्या पर्यावरण, वन व हवामान बदल मंत्रालयाचे सदस्य डॉ. एस.व्ही. पाटील, सांडपाणी प्रक्रिया प्रकल्पातील अडचणी व निराकरण या विषयावर पुणे मिटकॉनचे अध्यक्ष डॉ. एकनाथ अल्हाट, यशोगाथा: स्प्रेपॉड ओव्हरफ्लो ट्रीटमेंट प्लांट या विषयावर क्रांती अग्रणी डॉ. जी.डी. बापू लाड सहकारी साखर कारखाना लि. सांगलीचे श्री. सागर पाटील आणि वायु प्रदूषण या विषयावर पर्यावरण मूल्यांकन समितीचे माजी सदस्य डॉ. आर.डी. डोड यांनी प्रबोधन केले.

सदर परिषदेसाठी महाराष्ट्रातील २१९ साखर कारखान्याचे चेअरमन, व्यवस्थापकीय संचालक, पर्यावरण अधिकारी, रसायनतज्ञ असे २८० अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. पल्लवी सुर्यवंशी यांनी तर आभार डॉ. धर्मेंद्रकुमार फाळके यांनी मानले. सदर परिषद यशस्वी पार पाडण्यासाठी कृषि महाविद्यालय, पुणे येथील मृदा शास्त्र विभागाचे सहयोगी प्राध्यापक डॉ. धर्मेंद्रकुमार फाळके आणि मिटकॉनचे अध्यक्ष डॉ. संदीप जाधव यांनी विशेष परिश्रम घेतले.

## पुणे येथील देशी गाय संशोधन व प्रशिक्षण केंद्राकडून फुले स्वयंचलित हवामान केंद्राची उभारणी व फुले अमृतकाळ ॲप विकसित





**दि. १९ ऑगस्ट, २०२४.** कृषि महाविद्यालय, पुणे येथील देशी गाय संशोधन व प्रशिक्षण केंद्राने विद्यापीठाच्या स्मार्ट व अचूक शेतीसाठी डिजिटल तंत्रज्ञान या सेंटर ऑफ एक्सलन्सच्या सहकार्यातून तापमान आर्द्रता निर्देशांक आधारित पशुसल्ला देण्याकरिता फुले अमृतकाळ हे

ॲप विकसित केले आहे. या ॲप्लिकेशनला तापमानाच्या व आर्द्रतेच्या अद्ययावत तसेच इत्यंभूत व अचूक माहितीची आवश्यकता असते त्यासाठी हवामान केंद्र सुरू करण्यात आले आहे. या हवामान केंद्राचे उद्घाटन कुलगुरु डॉ. पी.जी. पाटील यांच्या शुभहस्ते करण्यात आले. यावेळी माहिती देतांना कुलगुरु डॉ. पाटील म्हणाले की हवामान आधारित अचूक पशुधन सल्ला व्यवस्थापन महत्त्वाचे असून ही गरज भागविण्यासाठी देशी गाय संशोधन व प्रशिक्षण केंद्रात फुले स्वयंचलित हवामान केंद्राची (फुले ऑटोमॅटिक वेदर स्टेशन) उभारणी केली आहे. या संशोधन केंद्राने देशातील पहिले तापमान आर्द्रता निर्देशांक आधारित पशुसल्ला ॲप फुले अमृतकाळ तयार केले आहे. या ॲपमध्ये ओपनसोर्स सैटेलाइट वरून तसेच सेन्सरचा वापर करून तापमान व आर्द्रतेची माहिती घेत जनावरांमध्ये उष्णतेमुळे निर्माण होणारा ताण ओळखता येतो. 'फुले अमृतकाळ' ॲप शेतकऱ्यांसाठी प्लेस्टोअरवर मोफत उपलब्ध आहे. पशुधन व्यवस्थापनामध्ये स्मार्ट हवामान केंद्राचा अंतर्भाव ही एक महत्त्वाची गोष्ट साध्य झाली आहे. यावेळी कृषि महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. महानंद माने यांनी फुले अमृतकाळ ॲपची फुले स्वयंचलित हवामान केंद्राशी सांगड घातल्याने वातावरणातील विविध घटकांचे व्यवस्थापन करून गाईगुरांवर येणारा ताण कमी करून त्यांचे आरोग्य योग्य पद्धतीने राखता येईल असे नमूद केले. याप्रसंगी देशी गाय संशोधन व प्रशिक्षण केंद्राचे प्रमुख शास्त्रज्ञ डॉ. सोमनाथ माने यांनी मार्गदर्शन केले.

## परळी येथील कृषि प्रदर्शनात महात्मा फुले कृषि विद्यापीठाच्या दालनास शेतकऱ्यांचा उत्तम प्रतिसाद





**दि. २३ ऑगस्ट, २०२४.** बीड जिल्ह्यातील परळी वैजनाथ येथे दि. २१ ऑगस्ट, २०२४ पासून सुरु झालेल्या कृषि महोत्सवानिमित्त भरविण्यात आलेल्या कृषि प्रदर्शनात राहुरीच्या महात्मा फुले कृषि विद्यापीठाच्या प्रदर्शन दालनास शेतकऱ्यांचा उत्तम प्रतिसाद मिळाला. कुलगुरु डॉ. पी.जी. पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली व संशोधन संचालक डॉ. विठ्ठल शिर्के, विस्तार शिक्षण संचालक डॉ. गोरक्ष ससाणे यांच्या नेतृत्वाखाली हे प्रदर्शन दालन उभारण्यात आले. यामध्ये विस्तार शिक्षण संचालनालय, राष्ट्रीय बियाणे प्रकल्पाचा बियाणे विभाग, उद्यानविद्या विभाग, वनस्पतीशास्त्र विभाग, कृषि विद्या विभाग, कास्ट प्रकल्प, देशी गाय संशोधन प्रकल्प, जलसिंचन व निचरा अभियांत्रिकी विभाग, पशुसंवर्धन व दुग्धशास्त्र विभाग, कृषि किटकशास्त्र विभाग, वनस्पती रोगशास्त्र व कृषि अणुजीवशास्त्र विभाग, मृदविज्ञान व कृषि रसायनशास्त्र विभाग, कृषि अर्थशास्त्र विभाग, आंतरविद्याशाखा व जलसिंचन विभाग, कृषि अवजारे विभाग, कृषि विज्ञान केंद्र, मोहोळ, धुळे व जळगांव या केंद्रांचा यामध्ये समावेश होता. विद्यापीठाच्या ड्रोनच्या स्टॉलला शेतकऱ्यांनी मोठ्या प्रमाणावर गर्दी करून माहिती घेतली. विद्यापीठाच्या प्रदर्शन दालनास राज्याचे कृषिमंत्री मा. ना. श्री. धनंजय मुंडे यांनी भेट दिली तसेच महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. पी.जी. पाटील, अकोला येथील डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. शरद गडाख व परभणी येथील मराठवाडा कृषि विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. इंद्र मणी यांनी भेट दिली. याप्रसंगी डॉ. विठ्ठल शिर्के यांनी पाडेगाव येथील मध्यवर्ती ऊस संशोधन केंद्राने विकसित केलेल्या उसाच्या विविध वाणांबद्दलची माहिती त्यांना दिली. यावेळी डॉ. गोरक्ष ससाणे, पदव्युत्तर महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. साताप्पा खरबडे, कृषि तंत्रज्ञान माहिती केंद्राचे प्रमुख डॉ. दत्तात्रय पाचारणे, जनसंपर्क अधिकारी डॉ. गोकुळ वामन,पाडेगाव ऊस संशोधन केंद्राचे मृदा शास्त्रज्ञ डॉ. कैलास काळे व वरिष्ठ संशोधन सहाय्यक डॉ. दत्तात्रय थोरवे उपस्थित होते. राहुरी कृषि विद्यापीठाचे हे प्रदर्शनाचे दालन शेतकरी बांधवांची पहिली पसंती असल्याचे विस्तार शिक्षण संचालक डॉ. गोरक्ष ससाणे यांनी यावेळी सांगितले.

## परळी वैजनाथ येथे पाच दिवसीय राज्यस्तरीय कृषि महोत्सव संपन्न





**दि. २६ ऑगस्ट, २०२४.** बीड जिल्ह्यातील परळी वैजनाथ येथे कृषि विभागातर्फे पाच दिवसीय राज्यस्तरीय कृषि महोत्सव आयोजीत करण्यात आला. या राज्यस्तरीय कृषि महोत्सवास महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. पी.जी. पाटील यांनी भेट दिली. याप्रसंगी संशोधन संचालक डॉ. विठ्ठल शिर्के, विस्तार शिक्षण संचालक डॉ. गोरक्ष ससाणे, प्रगतशील शेतकरी कृषि पदवीधर श्री. माधवराव दहिफळे उपस्थित होते. यावेळी कुलगुरु डॉ. पी.जी. पाटील म्हणाले की जास्तीत जास्त शेतकरी बाधंवांनी कृषि महोत्सवास भेट देवून नवनविन तंत्रज्ञान, कृषि औजारे, कृषि विद्यापीठाने विकसीत केलेले तंत्रज्ञान तसेच तज्ञांच्या मार्गदर्शनाचा जास्तीत जास्त शेतकरी बाधंवांनी लाभ घ्यावा. कृषि विभागातर्फे परळी वैजनाथ येथे पाच दिवसीय भव्य राज्यस्तरीय कृषि प्रदर्शन, पशु प्रदर्शन त्याचबरोबर राज्यभरातील शेतकऱ्यांना मार्गदर्शक ठरतील. हे भव्य कृषि प्रदर्शन शेतकऱ्यांसाठी अत्यंत उपयुक्त आहे असे ते म्हणाले.

### अभिनंदन

## डॉ.महावीरसिंग चौहान यांना सर्वोत्कृष्ट कार्यक्रम समन्वयक म्हणून व महात्मा फुले कृषि विद्यापीठाला सर्वोत्कृष्ट विद्यापीठ म्हणून शासनाचा राज्यस्तरीय पुरस्कार जाहीर



**दि. १७ ऑगस्ट, २०२४.** महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्रशिक्षण विभागाअंतर्गत राष्ट्रीय सेवा योजनेचा सन २०२२-२३ या वर्षीचा कृषि व अकृषि विद्यापीठांचे राज्यस्तरीय पुरस्कार नुकतेच जाहीर करण्यात आले आहे. यामध्ये महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी येथील संचालक, राष्ट्रीय सेवा योजना तथा विद्यार्थी कल्याण अधिकारी पदावर कार्यरत असलेले डॉ. महावीरसिंग चौहान यांना सन २०२२-२३ वर्षासाठीचा राष्ट्रीय सेवा योजनेअंतर्गत महाराष्ट्र शासनाचा सर्वोत्कृष्ट कार्यक्रम समन्वयक म्हणून राज्य पुरस्कार तसेच महात्मा फुले कृषि विद्यापीठाला सर्वोत्कृष्ट विद्यापीठ म्हणून शासनाचा राज्य पुरस्कार जाहीर झाला आहे. डॉ चौहान यांनी राष्ट्रीय सेवा योजनेच्या संचालक तथा विद्यार्थी कल्याण अधिकारी म्हणून धुरा सांभाळल्यापासून कृषि विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील दहा जिल्ह्यांमध्ये निस्वार्थी भावनेने व एकनिष्ठेने राष्ट्रीय सेवा योजनेअंतर्गत विविध समाज व विद्यार्थी हिताचे कार्यक्रम व उपक्रम राबविले आहेत. त्यांची या कार्याची दखल घेऊन त्यांना शासनाद्वारे हा पुरस्कार जाहीर झाला आहे. त्याचबरोबर कृषि विद्यापीठाने राष्ट्रीय सेवा योजनेद्वारे शासनाने दिलेले विविध उपक्रम प्रभावीपणे राबविल्यामुळे महात्मा फुले कृषि विद्यापीठाला सर्वोत्कृष्ट विद्यापीठ म्हणून पुरस्कार जाहीर झाला आहे. कुलगुरू डॉ. पी.जी. पाटील, अधिष्ठाता डॉ. दिलीप पवार, कुलसचिव श्री. अरुण आनंदकर, संशोधन संचालक डॉ. विठ्ठल शिर्के, विस्तार शिक्षण संचालक डॉ. गोरक्ष ससाणे, सहयोगी अधिष्ठाता डॉ. सातप्पा खरबडे व राज्याचे विद्यमान एन एस एस प्रमुख डॉ. निलेश पाठक तसेच महाराष्ट्र आणि गोवाचे विभागिय संचालक श्री. अजय शिंदे यांनी डॉ. महावीरसिंग चौहान यांचे अभिनंदन केले आहे. राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्थापना दिनी म्हणजे दि. २४ सप्टेंबर, २०२४ रोजी त्यांना हा पुरस्कार दिला जाणार आहे.

मफुकृवि ई वार्ता
ऑगस्ट २०२४

## पाडेगाव येथील मध्यवर्ती ऊस संशोधन केंद्र सर्वोत्कृष्ट संशोधन केंद्र पुरस्काराने सन्मानीत




**दि. ३० ऑगस्ट, २०२४.** महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. पी.जी. पाटील यांचे नेतृत्व व मार्गदर्शनाखाली कार्यरत असलेल्या पाडेगाव येथील मध्यवर्ती ऊस संशोधन केंद्राला दी डेक्कन शुगर टेक्नॉलॉजिस्ट असोसिएशन (डीएसटीए), पुणे यांचेकडून सर्वोत्कृष्ट संशोधन केंद्र पुरस्काराने सन्मानीत करण्यात आले. डेक्कन शुगर टेक्नॉलॉजिस्ट असोसिएशनच्या ६९ व्या वार्षिक अधिवेशन व तंत्रज्ञान परिषद २०२४ मध्ये महाराष्ट्राचे माजी सहकार मंत्री व राष्ट्रीय साखर कारखाना महासंघाचे अध्यक्ष मा.ना.श्री. हर्षवर्धन पाटील, महाराष्ट्र राज्याचे साखर आयुक्त डॉ. कुणाल खेमनार, रेना सहकारी साखर कारखन्याचे अध्यक्ष श्री. दिलीपरावजी देशमुख आणि डीएसटीएचे अध्यक्ष श्री. शहाजी भड यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये पाडेगाव संशोधन केंद्राचे ऊस विशेषज्ञ डॉ. राजेंद्र भिलारे, ऊस रोगशास्त्रज्ञ डॉ. सुरज नलावडे, शरीरक्रिया शास्त्रज्ञ डॉ. कैलास भोईटे, ऊस पैदासकार डॉ. सुरेश उबाळे, ऊस बेणे विक्री अधिकारी डॉ. दत्तात्रय थोरवे, कनिष्ठ संशोधन सहाय्यक डॉ. किरण ओंबासे व डॉ. माधवी शेळके यांनी पुरस्कार स्विकारला. सदर परिषदेत ऊस रोगशास्त्र डॉ. सुरज नलावडे यांना उत्कृष्ट शोध निबंध सादरीकरण पुरस्कार देऊन गौरवण्यात आले. कुलगुरु डॉ. पी.जी. पाटील यांनी संशोधन केंद्र आंतरराष्ट्रीय दर्जाचे करण्याचा मनोदय व्यक्त केला असून संशोधन संचालक डॉ. विठ्ठल शिर्के तसेच महाराष्ट्रातील अनेक सहकारी व खाजगी कारखान्यांच्या कार्यकारी संचालक आणि ऊस विकास अधिकारी यांनी पाडेगाव संशोधन केंद्राच्या योगदानाला हा पुरस्कार जाहीर झाल्याने आंनद व्यक्त करुन पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

## विद्यापीठातील कर्मचारी व शेतकरी प्रशिक्षणासाठी जबलपूर येथे रवाना



**दि. २७ ऑगस्ट,२०२४.** महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे कर्मचारी आणि शेतकऱ्यांसाठी सौर ऊर्जा सिंचन योजना या विषयावर तीन दिवसांच्या क्षमता विकास प्रशिक्षणासाठी जबलपूर, मध्य प्रदेश येथे बोरलॉग इन्स्टिट्यूट फॉर साउथ एशिया (बिसा) या संस्थेत ३४ कर्मचारी आणि १४ शेतकरी असे एकूण ४८ प्रशिक्षणार्थींची पाचवी तुकडी रवाना झाली. विद्यापीठातील कर्मचारी व शेतकरी यांचा समावेश असलेल्या

तुकडीला प्रशिक्षणासाठी निरोप देताना कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून मा.आ.श्री. प्राजक्तदादा तनपुरे उपस्थित होते. महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. पी.जी. पाटील यांचे सूचनेनुसार व संशोधन संचालक डॉ. विठ्ठल शिर्के यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यापीठातील कर्मचारी आणि शेतकरी यांच्यासाठी सदरील प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले आहे.

यावेळी मा.आ.श्री. प्राजक्तदादा तनपुरे मार्गदर्शन करतांना म्हणाले की भविष्यामध्ये शेतीतील सिंचनासाठी सौर ऊर्जा ही महत्त्वाची ठरणार आहे. त्यादृष्टीने केंद्र आणि राज्य सरकार पाऊल उचलत आहेत. सौर ऊर्जेच्या माध्यमातून सिंचन प्रणालीसाठी शेतकऱ्यांचे बळकटीकरण करणे गरजेचे आहे. त्यादृष्टीने सौरऊर्जा सिंचन प्रणाली या विषयावर शेतकऱ्यांसाठी व विद्यापीठ कर्मचाऱ्यांसाठी मध्य प्रदेशातील जबलपूर येथे बोरलॉग इन्स्टिट्यूट फॉर साउथ एशिया (बिसा) संस्थेमध्ये तीन दिवसांच्या प्रशिक्षणासाठी महात्मा फुले कृषि विद्यापीठ करत असलेले प्रयत्न निश्चितच अभिनंदनीय आहेत. येणाऱ्या भविष्यात सौर ऊर्जा सिंचन प्रणाली शेतीसाठी भविष्यातील गरज ठरणार आहे. यावेळी इंडियन डेअरी असोसिएशनचे उपाध्यक्ष डॉ. अरुण पाटील यांनी प्रशिक्षणार्थींना मार्गदर्शन केले. कृषि अभियांत्रिकी विभागाचे विभाग प्रमुख डॉ. मुकुंद शिंदे आणि काटेकोर शेतीसाठी डिजिटल तंत्रज्ञानावर आधारित सेंटर ऑफ एक्सेलन्सचे सहप्रमुख संशोधक डॉ. सुनील कदम यांनी प्रशिक्षणा संदर्भात मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. शुभांगी घाडगे यांनी तर आभार डॉ. रवी आंधळे यांनी मानले.

## महात्मा फुले कृषि विद्यापीठात खरीप हंगामासाठीची विभागीय बैठक संपन्न



**दि. ९ ऑगस्ट, २०२४.** महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी व कृषि विभाग, महाराष्ट्र शासन यांच्या संयुक्त विद्यमाने महात्मा फुले कृषि विद्यापीठात विभागीय कृषि संशोधन व विस्तार सल्लागार समिती खरीप-२०२४ च्या बैठकीचे आयोजन हायब्रीड मोडमध्ये करण्यात आले होते. या बैठकीच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. पी.जी. पाटील होते. यावेळी अधिष्ठाता डॉ. दिलीप पवार, संशोधन संचालक श्री. विठ्ठल शिर्के, विस्तार शिक्षण संचालक डॉ. गोरक्ष ससाणे, विभागीय कृषि सहसंचालक श्री. रफिक नाईकवडी, श्री. उमेश पाटील, श्री. रविशंकर चलवदे, सहयोगी अधिष्ठाता डॉ. साताप्पा खडबडे व सहयोगी संशोधन संचालक डॉ. विजय शेलार उपस्थित होते.

यावेळी कुलगुरु डॉ. पी.जी. पाटील आपल्या मार्गदर्शनात म्हणाले की कृषि विद्यापीठातील शास्त्रज्ञ, कर्मचारी तसेच कृषि विभागातील अधिकारी व कर्मचारी शेतकऱ्यांचे विविध प्रश्न सोडविण्यासाठी अथकपणे प्रयत्न करीत आहेत. विद्यापीठाने यावर्षी ६ वाण, ८९ कृषि तंत्रज्ञान शिफारशी व ४ सुधारित अवजारे प्रसारित केली आहे. यावेळी डॉ. विठ्ठल शिर्के यांनी संशोधन अहवालाचे सादरीकरण केले. संचालक विस्तार शिक्षण डॉ. गोरक्ष ससाणे यांनी विद्यापीठाचे विस्तार शिक्षण उपक्रमांचे सादरीकरण केले. डॉ. मुकुंद शिंदे यांनी सौर उर्जा संचलीत सिंचन प्रणाली या विषयावर सादरीकरण केले. यावेळी मान्यवरांच्या हस्ते श्री सुगी खरीप व इतर प्रकाशनांचे विमोचन करण्यात आले. विद्यापीठ कार्यक्षेत्रातील कृषि सहसंचालक यांनी त्यांच्या विभागांचा अहवाल सादर केला. बैठकीदरम्यान डॉ. साताप्पा खरबडे यांनी फळमाशी व वांझ रोगावरील औषधे, डॉ. सचिन नलावडे यांनी ड्रोनद्वारे फवारणी करण्याचे मानके, डॉ. विजू अमोलिक यांनी केळी व नाचणी पिकाविषयीचे प्रश्न, डॉ. बी.टी. पाटील यांनी केळी, ड्रगन फ्रुट, सफरचंद, स्ट्राबेरी व प्लॅस्टिक आच्छादन याविषयी, डॉ. विक्रम कड यांनी कांदा डीहायड्रेशन, हिरवी मिरची, नाचणी पिकांविषयीचे प्रश्न, डॉ. अशोक पिसाळ यांनी ऊस पिकाविषयीचे प्रश्न, डॉ. अनिल दुरगुडे यांनी सूक्ष्मअन्नद्रव्यांविषयी, डॉ. नरेंद्र काशीद भात पिकानंतर घ्यावयाची पिके, डॉ. तुळशीदास बास्टेवाड कृषि अवजारांविषयी, डॉ. सुनील कराड यांनी मका पिकाविषयी,

डॉ. दिलीप देवकर जनावरांच्या खाद्याविषयी, डॉ. योगेश बन यांनी नाचणी पिकाविषयी, डॉ. कैलास भोईटे यांनी सुपरकेन नर्सरीविषयी, डॉ. नंदकुमार भुते यांनी कपाशीवरील बुरशीनाशकांची माहिती या विषयांवर मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे स्वागत व प्रास्ताविक डॉ. विजय शेलार यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. भगवान देशमुख यांनी तर आभार डॉ. गोकुळ वामन यांनी मानले. या बैठकीस विद्यापीठाचे सहयोगी अधिष्ठाता, कृषि सहसंचालक, जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, विभाग प्रमुख, उपविभागीय कृषि अधिकारी, विद्यापीठ शास्त्रज्ञ व कृषि विभागाचे अधिकारी ऑनलाईन व ऑफलाईन पध्दतीने उपस्थित होते.

## शेळी संशोधन प्रकल्पामध्ये गोट गॅलरीचे उद्घाटन संपन्न





**दि. १३ ऑगस्ट, २०२४.** महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी येथील अखिल भारतीय समन्वित शेळी संशोधन प्रकल्पामध्ये शेळ्यांच्या विविध जाती, वेगवेगळ्या व्यवस्थापन पध्दती, प्रजनन, आहार, पोषण, आरोग्य व्यवस्थापन, दुध, लेंडीचे मुल्यवर्धन तसेच शासकीय योजनांसाठी प्रकल्प अहवाल यांची आवश्यक असलेली माहिती छायाचित्रांसह शेतकऱ्यांना उपलब्ध होणेसाठी गोट गॅलरीची उभारणी करण्यात आली. या गोट गॅलरीचे उद्घाटन कुलगुरु डॉ. पी.जी. पाटील यांचे हस्ते करण्यात आले. या प्रसंगी अधिष्ठाता डॉ. दिलीप पवार, संशोधन संचालक डॉ. विठ्ठल शिर्के, विस्तार शिक्षण संचालक डॉ. गोरक्ष ससाणे, पशुसंवर्धन व दुग्धशास्त्र विभागाचे प्रमुख डॉ. दिनकर कांबळे, कृषि अभियांत्रिकी व आंतरविद्या जलसिंचन व्यवस्थापन विभाग प्रमुख, डॉ. मुकुंद शिंदे, सहयोगी संशोधन संचालक डॉ. विजय शेलार, शेळी संशोधन प्रकल्पाचे वरिष्ठ शास्त्रज्ञ डॉ. विष्णु नरवडे व सुरक्षा अधिकारी श्री. गोरक्ष शेटे उपस्थित होते. यावेळी कुलगुरु डॉ. पाटील मार्गदर्शन करतांना म्हणाले की विद्यापीठाच्या शेळी संशोधन प्रकल्पामध्ये उभारण्यात आलेली गोट गॅलरी शेळी प्रकल्पाला भेट देणाऱ्या शेतकऱ्यांसाठी मार्गदर्शक ठरणार आहे. शेतकऱ्यांसाठी शेळीपालन हा सहजा सहजी करता येणारा व्यवसाय असुन गरज लागेल तेव्हा सहज पैसा हातात मिळवुन देणारे शेळीपालन हे शेतकऱ्यांसाठी ए.टी.एम. मशीन आहे. या प्रसंगी झालेल्या कार्यक्रमात शेळी संशोधन प्रकल्पाने तयार केलेल्या पुस्तिकेचे मान्यवरांच्या हस्ते विमोचन करण्यात आले. याप्रसंगी कार्यक्रमाची पार्श्वभूमी व संकल्पना डॉ. विष्णु नरवडे यांनी विषद केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन संशोधन उपसंचालक डॉ. बाळासाहेब पाटील यांनी केले. पशुसंवर्धन व दुग्धशास्त्र विभागाचे अधिकारी, विद्यार्थी व कर्मचारी तसेच परिसरातील शेतकरी यावेळी उपस्थित होते.

## महात्मा फुले कृषि विद्यापीठात हर घर तिरंगा अभियान

**दि. १३ ऑगस्ट, २०२४.** महात्मा फुले कृषि विद्यापीठातील पदव्युत्तर महाविद्यालयाच्या इमारतीसमोर कुलगुरु डॉ. पी.जी. पाटील यांच्या शुभहस्ते ध्वजवंदन करण्यात आले. यावेळी हर घर तिरंगा या अभियानांतर्गत तिरंगा प्रतिज्ञा घेण्यात आली. याप्रसंगी कुलगुरु डॉ. पी.जी. पाटील यांनी उपस्थित सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांना तिरंगा प्रतिज्ञा दिली. यावेळी कुलगुरु डॉ. पाटील मार्गदर्शन करतांना म्हणाले की भारतीय स्वातंत्र दिन १५ ऑगस्ट, २०२४ रोजी संपूर्ण देशभर साजरा होत आहे. या अंतर्गत दि. ९ ते १५ ऑगस्ट, २०२४ या कालावधीत हर घर तिरंगा हे अभियान राबविण्यात येत आहे. तरी सर्वांनी या हर घर तिरंगा अभियानात सहभाग घ्यावा. याप्रसंगी अधिष्ठाता डॉ. दिलीप पवार, कुलसचिव श्री. अरुण आनंदकर, संशोधन संचालक डॉ. विठ्ठल शिर्के, विस्तार शिक्षण संचालक डॉ. गोरक्ष ससाणे, पदव्युत्तर महाविद्यालयाचे

वर्ष :४, अंक क्रं. : ४३, जुलै, २०२४ महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी





सहयोगी अधिष्ठाता डॉ. साताप्पा खरबडे, प्रभारी नियंत्रक डॉ. बी.टी. पाटील, उपकुलसचिव प्रशासन श्री. विजय पाटील, सुरक्षा अधिकारी श्री. गोरक्ष शेटे, लेफ्ट. डॉ. सुनिल फुलसावंगे, विद्यापीठातील अधिकारी, कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## विद्यापीठातील डाळिंब गुणवत्ता केंद्रास इस्त्राईल येथील पाणी व्यवस्थापन तज्ञ श्री. उरी रुबीनस्टन यांची भेट



**दि. ३० ऑगस्ट, २०२४.** महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी येथील डाळिंब गुणवत्ता केंद्राच्या प्रात्यक्षिक प्रक्षेत्राला माशाव एम्बसी ऑफ इस्त्राईल येथील ॲग्रीकल्चर अटॅचीचे डाळिंब शेतीतील पाणी व्यवस्थापन तज्ञ श्री. उरी रुबीनस्टन यांनी भेट दिली. यावेळी उद्यानविद्या विभाग प्रमुख डॉ. बी.टी. पाटील, पुणे येथील महाराष्ट्र राज्य फलोत्पादन व औषधी वनस्पती मंडळाच्या प्रकल्प व्यवस्थापक सौ. पल्लवी देवरे, श्रीरामपूरचे उपविभागीय कृषि अधिकारी श्री. अमोल काळे, उद्यानविद्यावेता डॉ. सुभाष गायकवाड, कीटकशास्त्रज्ञ डॉ. अशोक वाळुंज व वनस्पती रोग शास्त्रज्ञ डॉ. प्रकाश मोरे उपस्थित होते. सदर भेटीदरम्यान श्री. उरी रुबीनस्टन यांनी राहुरी तालुक्यातील वरवंडी गावातील डाळिंब बागांची पाहणी करून उपस्थित शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले. यावेळी कृषि विद्यापीठाचे संपर्क शेतकरी श्री. बाळासाहेब कोंडीराम अडसुरे यांची डाळिंब बाग पाहून त्यांनी समाधान व्यक्त केले. श्री. अडसुरे यांच्याप्रमाणेच इतर सर्व शेतकऱ्यांनी कृषि विद्यापीठाचे प्रसारित तंत्रज्ञान आत्मसात करून डाळिंब शेती करणे गरजेचे असल्याचे त्यांनी सांगितले.

## कृषि पदवीच्या रिक्त जागांकरीता प्रवेश प्रक्रिया केंद्रीभुत केंद्रनिहाय पध्दतीने राबविण्यात येणार

**दि. २९ ऑगस्ट, २०२४.** कृषि पदवीच्या रिक्त जागांकरीता केंद्रभुत केंद्रनिहाय प्रवेश फेरी दि. २ सप्टेंबर, २०२४ ऐवजी दि. ३० ऑगस्ट, २०२४ पासून सुरु होणार आहे. राज्य समायिक प्रवेश परिक्षा कक्ष कृषि पदवीच्या रिक्त जांगांकरीता केंद्रीभुत केंद्रनिहाय प्रवेश फेरी यापूर्वी दि. २ ते ७ सप्टेंबर, २०२४ या कालावधीमध्ये राबविणार होती. तथापि यामध्ये आता बदल करण्यात येत असून आता केंद्रभूत प्रवेश फेरी ३० ऑगस्ट, २०२४ ते ५ सप्टेंबर, २०२४ या कालावधीत राबविण्यात येणार आहे. महात्मा फुले कृषि विद्यापीठाच्या दहा जिल्ह्यांच्या

कार्यक्षेत्रामध्ये ही प्रवेश प्रक्रिया दोन केंद्रावर राबविण्यात येणार आहे. यामध्ये पहिले प्रवेश प्रक्रिया केंद्र राहुरी येथील डॉ. अण्णासाहेब शिंदे कृषि अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालय असून यामध्ये अहमदनगर, नाशिक, धुळे, नंदुरबार व जळगांव या जिल्ह्यातील सर्व घटक/विनाअनुदानीत कृषि महाविद्यालये यांचा समावेश आहे. दुसरे प्रवेश प्रक्रिया केंद्र पुणे येथील कृषि महाविद्यालय असून याअंतर्गत पुणे, सोलापूर, सातारा, सांगली व कोल्हापूर या जिल्ह्यातील सर्व घटक/विनाअनुदानीत कृषि महाविद्यालये यांचा समावेश आहे अशी माहिती कुलसचिव श्री. अरुण आनंदकर यांनी दिली.

## कृषि अभियांत्रिकी महाविद्यालयात ड्रोन तंत्रज्ञानाद्वारे कॅडस्ट्रल सर्वेक्षण व मॅपींग या विषयावर दोन दिवसाचे प्रशिक्षण



**दि. ५ ऑगस्ट, २०२४.** महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. पी.जी. पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यरत असलेल्या काटेकोर शेतीसाठी डिजिटल तंत्रज्ञानावर आधारित सेंटर ऑफ एक्सलन्स आणि रिमोट पायलट प्रशिक्षण संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने ड्रोन तंत्रज्ञानाद्वारे कॅडस्ट्रल सर्वेक्षण व मॅपींग या विषयावर दोन दिवसाचे प्रशिक्षण डॉ. अण्णासाहेब शिंदे कृषि अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालयातील प्रशिक्षण सभागृहात आयोजीत करण्यात आले होते. या प्रशिक्षण कार्यक्रमाच्या उद्‌घाटनप्रसंगी अध्यक्षस्थानी अधिष्ठाता डॉ. दिलीप पवार होते. यावेळी व्यासपीठावर विस्तार शिक्षण संचालक डॉ. गोरक्ष ससाणे, हाळगांव कषि महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. अनिल काळे, कृषि अभियांत्रिकी विभाग प्रमुख डॉ. मुकुंद शिंदे, कृषि शक्ती व अवजारे विभाग प्रमुख डॉ. सचिन नलावडे व अमिटी इंजिनीअर्स आणि सर्वेअरचे मुख्य कार्यकारी अधिकारी इंजि. योगेश जाधव उपस्थित होते. यावेळी डॉ. दिलीप पवार आपल्या मार्गदर्शनात म्हणाले की ड्रोनचा उपयोग पिकांवर फक्त औषध फवारणीसाठीच नसून नैसर्गिक साधनसंपत्ती, वने, आरोग्य सेवा, दळणवळण, दुर्गम भागातील सर्वेक्षण यासाठी मोठ्या प्रमाणावर होत आहे. त्याचबरोबर ड्रोन तंत्रज्ञानाचा उपयोग नैसर्गिक आपत्तीमध्ये झालेल्या नुकसानीचा अंदाज घेण्यासाठीही व मदत कार्य करण्यासाठी होत आहे. डॉ. गोरक्ष ससाणे आपल्या मार्गदर्शनात म्हणाले की सध्याचे युग हे डिजीटल तंत्रज्ञानाचे आहे. महात्मा फुले कृषि विद्यापीठातील कास्ट प्रकल्पामध्ये ड्रोन तंत्रज्ञानावर महत्वाचे संशोधन झाले आहे. यावेळी डॉ. मुकुंद शिंदे यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले व डॉ. सचिन नलावडे यांनी आभार मानले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. शुभांगी घाडगे यांनी केले. सदर प्रशिक्षणात अमिटी इंजिनीअर्स व सर्वेअर, पुणे येथील तज्ञ प्रशिक्षक तसेच विद्यापीठातील डॉ. सुनील कदम यांनी मार्गदर्शन केले. या प्रशिक्षणाचे आयोजन सचिव डॉ. सचिन नलावडे, संयोजक डॉ. मुकुंद शिंदे तर सहसंयोजक म्हणुन डॉ. सुनील कदम होते. या प्रशिक्षणासाठी विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील ३० प्राध्यापक व शास्त्रज्ञांनी सहभाग नोंदवला.

## संशोधन संचालक डॉ. विठ्ठल शिर्के यांच्या कोल्हापूर येथील विविध संशोधन प्रकल्पांना भेटी

**दि. ६ ऑगस्ट, २०२४.** महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे संशोधन संचालक डॉ. विठ्ठल शिर्के यांनी कोल्हापूर येथील विभागीय कृषि संशोधन केंद्र, शेंडा पार्क, तसेच येथील प्रक्षेत्र, जनावरे संगोपन गोठा व उद्यानविद्या रोपवाटिका यांना भेटी देवून संशोधन कार्याचा आढावा घेतला. यावेळी सहयोगी संशोधन संचालक डॉ. अशोक पिसाळ यांनी विभागीय कृषि संशोधन केंद्राचा आढावा सादर केला. यानंतर आखिल भारतीय समन्वयीत मका सुधार प्रकल्प, कसबा बावडा यांच्या अधिनस्त शेंडा पार्क येथील मका संशोधन प्रक्षेत्राची पाहणी करुन तांत्रिक चर्चासत्रात



डॉ. विठ्ठल शिर्के यांनी सहभाग घेतला. यावेळी मार्गदर्शन करतांना ते म्हणाले की या संशोधन केंद्राने मका संशोधनामध्ये भरीव कामगिरी करून मक्याच्या उत्कृष्ट वाणांची निर्मिती केलेली आहे तसेच मक्यामध्ये विविध संशोधन शिफारशी विकसीत करुन शेतकऱ्यांचा आर्थिक स्तर वाढविण्यास मदत केलेली आहे. कार्यक्रमाचे प्रास्ताविक संशोधन केंद्राचे मका पैदासकार डॉ. सुनिल कराड यांनी केले. डॉ. प्रवीण गजभिये यांनी संशोधन केंद्रातील कार्याचे सादरीकरण केले. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन डॉ. सुहास भिंगारदेवे यांनी तर आभार प्रदर्शन डॉ. प्रवीण गजभिये यांनी केले. कार्यक्रमास ऊस आणि गुळ संशोधन केंद्राचे कृषिविद्यावेत्ता डॉ. सागर गेडाम, डॉ.बापूसाहेब गायकवाड, डॉ. गोविंद येनगे, विभागीय कृषि संशोधन केंद्राचे पशुचिकित्सक डॉ. महिंद्र यादव, कनिष्ठ नाचणी पैदासकार डॉ. योगेश बन, कृषि अर्थशास्त्रज्ञ डॉ. बाबासाहेब कांबळे राधानगरी येथील भात संशोधन केंद्राचे प्रभारी अधिकारी डॉ. शैलेश कुंभार, मका संशोधन केंद्राचे श्री. सुशांत महाडीक, शास्त्रज्ञ, अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

## जाधववाडी येथील अंजीर, सिताफळ संशोधन केंद्राला संशोधन संचालक डॉ. विठ्ठल शिर्के यांची भेट



**दि. २६ ऑगस्ट, २०२४.** महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी अंतर्गत असलेल्या अखिल भारतीय समन्वित अंजीर सिताफळ संशोधन केंद्र, जाधववाडी, ता. पुरंदर, जि. पुणे येथे महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे संशोधन संचालक डॉ. विठ्ठल शिर्के यांनी भेट दिली. संशोधन प्रकल्पाचे उद्यानविद्यावेत्ता डॉ. प्रदीप दळवे यांनी संशोधन प्रकल्पाची सद्यस्थिती व सुरू असलेल्या संशोधन कार्याचे सादरीकरण केले. प्रक्षेत्र भेटीदरम्यान डॉ. शिर्के यांनी प्रकल्पात सुरु असलेल्या संशोधन कार्याचा आढावा घेतला व प्रयोगांची पाहणी केली तसेच त्यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. डॉ. शिर्के यांनी जैविक व अजैविक ताण सहन करणाऱ्या अंजीर आणि सिताफळ या फळपिकांच्या जातींबाबत तसेच दुर्मिळ व दुर्लक्षित होत चाललेल्या कोरडवाहू फळपिकांचे संवर्धन आणि त्यावर संशोधन होणे गरजेचे असल्याचे मत व्यक्त केले. संशोधन करताना शेतकरी व ग्राहक वर्गाच्या प्रतिसादाकडे लक्ष देणे गरजेचे असल्याचे प्रतिपादन त्यांनी केले. भेटीदरम्यान त्यांनी चालू असलेल्या संशोधन कार्याबद्दल समाधान व्यक्त केले व प्रभावी संशोधनासाठी मौलिक सुचना केल्या. डॉ. युवराज बालगुडे यांनी आभार प्रदर्शन केले. यावेळी वरिष्ठ संशोधन सहाय्यक सुनील नाळे, नितीश घोडके व सतीश काळे उपस्थित होते.

## कृषि महाविद्यालय, पुणे येथे ७८ वा स्वातंत्र्य दिवस उत्साहात संपन्न






**दि. १५ ऑगस्ट, २०२४.** कृषि महाविद्यालय, पुणे येथे देशाचा ७८ वा स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी कृषि महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. महानंद माने, विद्यार्थी परिषदेचे उपाध्यक्ष डॉ. विजय तरडे, विद्यार्थी कल्याण अधिकारी डॉ. प्रमोद पाटील, सहाय्यक कुलसचिव श्री. राजेंद्र निक्रड उपस्थित होते. याप्रसंगी ध्वजारोहन केल्यानंतर डॉ. महानंद माने आपल्या मार्गदर्शनात म्हणाले की देशाचा ७८ वा स्वातंत्र्य दिवस साजरा करत असताना अनेक महान स्वातंत्र्यसेनानी, समाजसुधारक, क्रांतिकारक आणि देशभक्तांनी देशाच्या स्वातंत्र्यासाठी आपल्या प्राणांची आहुती दिली होती. त्यांनी पाहिलेली स्वप्ने साकार करण्यासाठी आपण सर्व कटिबद्ध आहोत. महाविद्यालयाच्या देशी गाय संशोधन व प्रशिक्षण केंद्रास संपूर्ण देशात नावलौकिक लाभला असून नुकतेच महाराष्ट्र शासनाने या केंद्राच्या बळकटीकरणासाठी ७१ कोटींचा निधी मंजूर केला आहे. या कार्यक्रमानंतर कृषि महाविद्यालय, पुणे आणि उपासना ग्लोबल फोरमच्या संयुक्त विद्यमाने वृक्षारोपण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. त्यामध्ये महाविद्यालयातील प्राध्यापक, कर्मचारी, विद्यार्थी, विद्यार्थिनी सहभागी झाले होते.

## हाळगांव कृषि महाविद्यालयात ७८ वा स्वातंत्रदिन उत्साहात संपन्न



**दि. १५ ऑगस्ट, २०२४.** महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी अंतर्गत असलेल्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कृषि महाविद्यालय, हाळगाव येथे ७८ वा स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाप्रसंगी कृषि महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. अनिल काळे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी विद्यार्थी परिषद उपाध्यक्ष डॉ. दत्तात्रय सोनावणे, विद्यार्थी कल्याण अधिकारी डॉ. सखेचंद अनारसे, सांस्कृतिक कार्यक्रम सल्लागार डॉ. नजिर तांबोळी, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा. पोपट पवार, सहाय्यक प्राध्यापक डॉ. मनोज गुड, प्रा. अरुण पाळंदे, डॉ. राहुल विधाते, डॉ. निलेश लांडे, डॉ. उत्कर्षा गवारे, नवनाथ शिंदे, डॉ. किरण चौधरी, डॉ. दिपक वाळूंजकर, डॉ. शशी कांबळे, कर्मचारी, विद्यार्थी, विद्यार्थीनी उपस्थित होते. स्वातंत्र्य दिनानिमित्त महाविद्यालयात विविध

वर्ष :४, अंक क्रं. : ४३, जुलै, २०२४ महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी

सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन सांस्कृतिक कार्यक्रम सल्लागार डॉ. नजिर तांबोळी यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आले होते. तिरंगा यात्रा महाविद्यालयातून हाळगाव गावठाण, बाजारपेठ या ठिकाणी काढण्यात आली होती. महाविद्यालयाचे प्राध्यापक, कर्मचारी व विद्यार्थी यांच्या उपस्थितित कार्यक्रम उत्साहात पार पडला.

## कृषि तंत्र विद्यालय, मांजरी फार्म येथे ७८ वा स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा





**दि. १५ ऑगस्ट, २०२४.** कृषि तंत्र विद्यालय, मांजरी फ़ार्म, पुणे येथे ७८ वा स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा करण्यात आला. मांजरी फ़ार्म येथील कृषि तंत्र विद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस.टी. यादव यांच्या शुभहस्ते ध्वजारोहन करण्यात आले. ध्वजारोहनासाठी कृषि तंत्र विद्यालयातील अधिकारी, कर्मचारी आणि विद्यार्थी, विद्यार्थीनी उपस्थित होते. यावेळी मांजरी फ़ार्म येथील ग्रामसेवक प्रशिक्षण केंद्राचे प्राचार्य श्री. आर.एस. काळभोर आणि इतर अधिकारी व कर्मचारी यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून राष्ट्रध्वजास मानवंदना दिली. सदर कार्यक्रमाचे प्रास्ताविक कृषि तंत्र विद्यालयाचे कृषि सहाय्यक श्री. पी.डी. वनवे यांनी केले. याप्रसंगी स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधून विद्यालयाच्या परिसरात नारळ (जात–टी_डी) रोपांची लागवड करण्यात आली. सदर उपक्रम डॉ. एस.टी. यादव यांच्या मार्गदर्शनाखाली कनिष्ठ संशोधन सहाय्यक श्रीमती एस.जी. नवसुपे, कृषि सहाय्यक श्री. पी.डी वनवे, श्री.माधव बिलाडी, श्रीमती. प्रीती वैरागर, श्रीमती. मनिषा खैरे यांच्या सहकार्याने राबविण्यात आला.

## कृषि विज्ञान संकुल, काष्टी, मालेगाव येथे रॅगिंग प्रतिबंध जनजागृती कार्यक्रम संपन्न



**दि. १४ ऑगस्ट, २०२४.** कृषि विज्ञान संकुल, मालेगाव अंतर्गत कार्यरत असलेल्या कृषि व्यवसाय व्यवस्थापन, उद्यानविद्या, कृषि अभियांत्रिकी, अन्न तंत्रज्ञान महाविद्यालये व कृषि तंत्रनिकेतन या महाविद्यालयांच्या संयुक्त विद्यमाने विद्यार्थ्यांमध्ये रॅगिंग प्रतिबंध जनजागृती कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. सदर कार्यक्रमाचे आयोजन कृषि विज्ञान संकुलाचे प्रमुख डॉ. सचिन नंदगुडे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी कृषि विज्ञान संकुलाचे प्रभारी प्रमुख डॉ. सोमनाथ सोनवणे होते. याप्रसंगी अन्नतंत्रज्ञान

महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता प्रा. विवेक कानवडे, विद्यार्थी कल्याण अधिकारी डॉ. संजय पाटील, कुलमंत्री डॉ. स्वाती खांदवे, डॉ. दिनेश बिरारी, डॉ. नेहा काळे व श्री. नारायण पाठक उपस्थित होते. यावेळी झालेल्या कार्यक्रमात डॉ. सोमनाथ सोनवणे यांनी रॅगिंग करणे हा गुन्हा आहे व त्याचे दुष्परिणाम सांगून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. प्रा. विवेक कानवडे यांनी रॅगिंग प्रतिबंध उपक्रमांमध्ये सहभागी होण्यासाठी तसेच आपला कॅम्पस रॅगिंग मुक्त ठेवण्यासाठी सर्व विद्यार्थ्यांना आवाहन केले. डॉ. संजय पाटील यांनी विदयार्थ्यांना रॅगिंग प्रतिबंध आठवड रूपरेषा माहिती करून दिली. डॉ. स्वाती खांदवे यांनी विद्यार्थ्यांना महाविद्यालयातील वातावरण उत्साही व रॅगिंगमुक्त रहावे असे मत व्यक्त केले. कार्यक्रमा दरम्यान डॉ. नेहा काळे यांनी रॅगिंग प्रतिबंध कायद्याची सविस्तर माहिती दिली. कार्यक्रमास विद्यार्थी, शिक्षक, कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. पल्लवी तांबे यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. शितल सोनवणे यांनी तर आभार डॉ. सुदामा काकडे यांनी मानले.

## कृषि अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या एनसीसी युनिटतर्फे रतनगड ट्रेकिंगचे यशस्वी आयोजन



**दि. २१ ऑगस्ट, २०२४.** राष्ट्रीय छात्र सेनेच्या छात्रांमध्ये साहस, धैर्य, एकता आणि शिस्त हे गुण विकसित करण्यासाठी डॉ. अण्णासाहेब शिंदे कृषि अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालयाच्या एनसीसी युनिटकडून रतनगड ट्रेकिंगच्या मोहिमेचे आयोजन करण्यात आले होते. या रतनगड ट्रेकिंग मोहिमेसाठी कुलगुरू डॉ. पी.जी. पाटील, अहमदनगर येथील १७ बटालियन एनसीसीचे कमांडिंग ऑफिसर कर्नल चेतन गुरबक्ष व अधिष्ठाता डॉ. दिलीप पवार यांचे मार्गदर्शन लाभले. रतनगड ट्रेकिंग मोहिमेसाठी २५ छात्र, पाच अधिकारी व कर्मचारी यांनी सहभाग घेतला. छात्रांमध्ये पर्यावरण संरक्षणाचा संदेश घेऊन या मोहिमेचे आयोजन करण्यात आले होते. छात्र हे कृषि विद्यापीठांमध्ये असल्यामुळे त्यांना निसर्ग जैवविविधता, प्राणी आणि विविध वनस्पती जवळून बघण्याची आणि निरीक्षणाची संधी या मोहिमेदरम्यान लाभली. यामुळे छात्रांमध्ये निसर्ग प्रेम व पर्यावरण याविषयी जाणीव व जागृती निर्माण झाली. रतनगड ट्रेकिंगचे आयोजन लेफ्ट. सुनील फुलसावंगे, राष्ट्रीय छात्र सेना अधिकारी डॉ. प्रणव पावसे, डॉ. हिमालया गणाचारी यांनी केले. यासाठी महाविद्यालयाचे कार्यकारी परिषदेचे विद्यार्थी परिषदेचे उपाध्यक्ष डॉ. सचिन नलावडे, डॉ. कैलास कांबळे, डॉ. विक्रम कड, डॉ. एस.बी. गडगे, डॉ. व्ही.एन. बारई, श्री. वैभव बारटक्के यांचे मार्गदर्शन लाभले.

## महात्मा फुले कृषि विद्यापीठात महसूल दिन साजरा

**दि. २ ऑगस्ट, २०२४.** मतदान देण्यासाठी आपले नांव मतदार यादीमध्ये असणे गरजेचे आहे. या महसुल सप्ताहानिमित्त ज्या विद्यार्थ्यांचे नांव मतदान यादीत नाही त्यांनी आपले नांव मतदार यादीत नोंदवावे. त्याचबरोबर मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेचाही सर्व विद्यार्थ्यांनी लाभ घ्यावा असे आवाहन विद्यार्थी कल्याण अधिकारी आणि कुलमंत्री डॉ. विजय पाटील यांनी केले. महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. पी.जी. पाटील व राहुरीचे तहसीलदार श्री. नामदेवराव पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पदव्युत्तर महाविद्यालय आणि महसूल विभाग, राहुरी यांच्या संयुक्त विद्यमाने महसूल सप्ताहानिमित्त महसूल दिनाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी अध्यक्षीय मार्गदर्शन करतांना डॉ. विजय पाटील बोलत होते. याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणुन बारागाव नांदुर येथील मंडळ अधिकारी सौ. सुनंदा मरकड उपस्थित होत्या. यावेळी व्यासपीठावर डॉ. देविदास खेडकर, डॉ. सचिन सदाफळ व श्री. किरण शेळके उपस्थित होते. प्रमुख मार्गदर्शन करतांना सौ. सुनंदा मरकड





म्हणाल्या की महाराष्ट्र शासनाचा महसूल विभाग दि. १ ऑगस्ट ते १५ ऑगस्ट या दरम्यान महसूल महसूल पंधरवडा साजरा करीत आहे. मुख्यमंत्री ना. श्री. एकनाथ शिंदे यांनी मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना जाहीर केलेली आहे. या योजनेअंतर्गत बारावी पास उत्तीर्ण असणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी रु.६०००/-, आयटीआय किंवा ग्रॅज्युएट असणाऱ्या विद्यार्थ्याला रु.८०००/- तर पदव्युत्तर पदवी धारण करणाऱ्या विद्यार्थ्यास रु.१०,०००/- मिळणार आहेत. यासाठी विद्यार्थ्यांचे वय १८ ते ३५ वर्ष इतके तर आधार कार्ड बँकेला लिंक असणे आवश्यक आहे. या विद्यार्थ्यांनी प्रथम रजिस्ट्रेशन करणे आवश्यक असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले. या कार्यक्रमासाठी पदव्युत्तर महाविद्यालयाचे विद्यार्थी व विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## महात्मा फुले कृषि विद्यापीठात अँटी रॅगींग डे साजरा






**दि. १६ ऑगस्ट, २०२४.** महात्मा फुले कृषि विद्यापीठातील पदव्युत्तर महाविद्यालयात कुलगुरु डॉ. पी. जी. पाटील, अधिष्ठाता डॉ. दिलीप पवार, कुलसचिव श्री. अरुण आनंदकर आणि पदव्युत्तर महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. साताप्पा खरबडे यांच्या मार्गदर्शनाखाली अँटी रॅगींग डे साजरा करण्यात आला. भारतातील विद्यापीठे व महाविद्यालयांत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांचा खेळीमेळीच्या वातावरणात व्यक्तिमत्व विकास व्हावा, शिक्षण घेत असताना त्यांना कोणत्याही शैक्षणिक अडचणी येवू नये यासाठी विद्यापीठ अनुदान आयोगाने १२ ऑगस्ट, २०२४ हा दिवस राष्ट्रीय अँटी रॅगिंग दिवस व भारतातील सर्व विद्यापीठे व महाविद्यालयांत १२ ते १८ ऑगस्ट हा राष्ट्रीय अँटी रॅगिंग सप्ताह साजरा करण्याचे निर्देशित केले होते. त्या अनुषंगाने अँटी रॅगींग दिवसाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी पदव्युत्तर महाविद्यालयाचे तांत्रिक अधिकारी डॉ. सुनील भणगे, पदव्युत्तर महाविद्यालयाचे विद्यार्थी कल्याण अधिकारी डॉ. विजय पाटील, वसतीगृहाचे मॉनीटर डॉ. दिलीप देवकर व प्रभारी सहाय्यक कुलसचिव श्री. किरण शेळके व विद्यार्थी, विद्यार्थीनी उपस्थित होते. यावेळी डॉ. सुनील भणगे यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना महाविद्यालयाच्या परिसरात शिस्तीचे पालन करून कोणतेही बेजबाबदार कृत्य न करण्यासाठी सूचित केले. येणाऱ्या शैक्षणिक वर्षांत महाविद्यालयात नव्याने येणाऱ्या विद्यार्थ्यांबरोबर कोणताही अनुचित प्रकार घडणार नाही याविषयीही काळजी घेण्याचे आवाहन केले.

यावेळी त्यांनी रॅगिंग म्हणजे काय, अँटी रॅगिंग कायदा तयार करण्यामागची पार्श्वभूमी समजावून सांगितली व या सर्व माहितीचे पावर पॉइंटद्वारे सादरीकरण केले. याप्रसंगी डॉ. विजय पाटील यांनी विद्यार्थ्यांना अँटी रॅगींगची शपथ दिली.

## कृषि अभियांत्रिकी महाविद्यालयात अँटी रॅगिंग दिवस साजरा






**दि. २० ऑगस्ट, २०२४.** महात्मा फुले कृषि विद्यापीठातील डॉ. अण्णासाहेब शिंदे कृषि अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालयात अँटी रॅगींग डे साजरा करण्यात आला. यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे अधिष्ठाता डॉ. दिलीप पवार होते. याप्रसंगी कुलमंत्री तथा प्राध्यापक डॉ. विक्रम कड, कृषि प्रक्रिया अभियांत्रिकी विभाग प्रमुख डॉ. कैलास कांबळे, प्राध्यापक डॉ. ममता पटवर्धन, तांत्रिक अधिकारी डॉ. सुनील फुलसावंगे, सहाय्यक कुलसचिव श्री. वैभव बारटक्के उपस्थित होते. यावेळी डॉ. दिलीप पवार मार्गदर्शन करतांना म्हणाले की महाविद्यालयीन जीवनामध्ये विद्यार्थ्यांनी वरिष्ठ व कनिष्ठ वर्गातील आपल्या मित्रांबरोबर सहकार्य, प्रेमाची व मैत्रिची भावना ठेवावी व जोपासावी. यावेळी डॉ. विक्रम कड यांनी रॅगिंग म्हणजे काय, अँटी रॅगिंग कायदा तयार करण्यामागची पार्श्वभूमी समजावून सांगितली व माहितीचे पावर पॉइंटद्वारे सादरीकरण केले. याप्रसंगी त्यांनी विद्यार्थ्यांना अँटी रॅगींगची शपथ दिली. याप्रसंगी डॉ. कैलास कांबळे, डॉ. ममता पटवर्धन, डॉ. सुनील फुलसावंगे यांनी अँटी रॅगींग संदर्भात सादरीकरण व मार्गदर्शन केले. यावेळी विद्यार्थी कु. गायत्री घळसासी, कु. चैताली मोरे व श्री. उत्कर्ष खोसे यांनी आपले मनोगत व्यक्त केले.

## राहुरी कृषि विद्यापीठातील शास्त्रज्ञांच्या डाळिंब व टॉमॅटो उत्पादक शेतकऱ्यांच्या बागेस भेटी व मार्गदर्शन





**दि. १४ ऑगस्ट, २०२४.** महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी येथील वनस्पती रोगशास्त्र व अणुजीवशास्त्र विभाग आणि कृषि विभाग, महाराष्ट्र शासन यांचे संयुक्त विद्यमाने राबविण्यात येणाऱ्या हॉर्टसॅप प्रकल्पामार्फत अहमदनगर जिल्ह्यातील कोपरगाव तालुक्यातील कोळपेवाडी, करवडी, माहेगांव देशमुख व काकडी या भागातील प्लॉटला विद्यापीठातील शास्त्रज्ञ व कृषि विभागातील अधिकारी यांनी भेटी दिल्या. या चमूमध्ये हॉर्टसॅप प्रकल्पाचे प्रमुख तथा वनस्पती रोगशास्त्र व कृषि अनुजीवशास्त्र विभाग प्रमुख डॉ. आण्णासाहेब नवले, अखिल भारतीय

वर्ष :४, अंक क्रं. : ४३, जुलै, २०२४ महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी

समन्वित कोरडवाहू फळपीक योजनेचे कनिष्ठ रोगशास्त्रज्ञ डॉ. प्रकाश मोरे, संशोधन सहयोगी डॉ. प्रवीण खैरे तसेच कृषि विभागातील कोळपेवाडीचे मंडळ कृषि अधिकारी श्री. पांडुरंग जाधव, पोहेगावचे मंडळ कृषि अधिकारी श्री. सुनील घारकर, काकडीचे कृषि सहाय्यक श्री. विशाल साबदे, रांजणगाव देशमुखचे कृषि सहायक श्रीमती तायडे हे उपस्थित होते. या भेटी दरम्यान शास्त्रज्ञ व अधिकाऱ्यांनी शेतकऱ्यांच्या प्रत्यक्ष शेतावर जाऊन डाळींब व टोमॅटो उत्पादक शेतकरी यांच्यामध्ये सविस्तर चर्चा केली आणि चर्चेदरम्यान शेतकऱ्यांच्या शंकांचे निरसन करुन डाळिंब व टोमॅटो पिकावरील कीड व रोग व्यवस्थापन आणि अधिक उत्पादनासाठी सविस्तर मार्गदर्शन केले. आर्थिक नुकसान पातळीच्यावर गेलेल्या गावांसाठी हॉर्टसॅप प्रकल्पांतर्गत वेळोवेळी एन.सी.आय.पी.एम., नवी दिल्ली या संकेतस्थळावर विद्यापीठामार्फत सदर पिकासाठी पीकसरंक्षण सल्ला दिला जातो. भेटीवेळी शेतकऱ्यांना विद्यापीठामार्फत तयार केलेल्या अडवायसरी देण्यात आल्या. सदर प्रक्षेत्र भेटीसाठी हॉर्ट्सॅप प्रकल्पाचे प्रकल्प समन्वयक डॉ. संजय कोळसे यांचे सहकार्य लाभले.

## पुणे येथे एक दिवसीय शेडनेट हाऊस व पॉलिहाऊस तंत्रज्ञान प्रशिक्षण संपन्न



**दि. १६ ऑगस्ट, २०२४.** महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी येथील काटेकोर शेती विकास केंद्र, जलसिंचन व निचरा अभियांत्रिकी विभाग, डॉ. अण्णासाहेब शिंदे कृषि अभियांत्रिकी महाविद्यालय, एन.सी.पी.एच., नवी दिल्ली व महाराष्ट्र सहकार विकास महामंडळ,साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने साखर संकुल, शिवाजीनगर येथे शेडनेट हाऊस व पॉलिहाऊस तंत्रज्ञान या विषयावरील एक दिवसीय प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले होते. या प्रशिक्षणाचे उद्घाटन पुणे येथील महाराष्ट्र राज्य फलोत्पादन आणि औषधी वनस्पती मंडळाचे प्रकल्प व्यवस्थापक श्री. सुभाष काटकर यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी व्यासपीठावर पुणे येथील राष्ट्रीय फलोत्पादन अभियानाचे राज्यस्तरीय तांत्रिक सल्लागार श्री. सचिन मोरे, एम.सी.डी.सी.चे प्रशिक्षण विभाग प्रमुख श्री. दिगंबर साबळे, एम.सी.डी.सी.चे मनुष्यबळ विकास तथा वरिष्ठ प्रशिक्षण अधिकारी श्री. हेमंत जगताप व बंगलोर येथील ग्रीप्लास्ट कंपनीचे विभागीय अधिकारी श्री. सोमनाथ जाधव उपस्थित होते. कार्यक्रमाच्या समारोप्रसंगी कृषि महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. महानंद माने, शिवाजीनगर, साखर संकुल येथील महाराष्ट्र सहकार विकास महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक श्री. मंगेश तिटकारे उपस्थित होते. यावेळी डॉ. महानंद माने यांनी प्रशिक्षण कार्यक्रम यशस्वीरित्या पूर्ण केल्याबद्दल सर्व प्रशिक्षणार्थींचे आभार मानले. या प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन काटेकर शेती विकास केंद्राचे प्रमुख संशोधक डॉ. सचिन डिंगरे यांच्या संकल्पनेतून करण्यात आले होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार श्री. हेमंत जगताप यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी श्रीमती शुभांगी भोलनकर, श्री. मयूर पवार व श्री. रेवणकुमार गाडे यांचे सहकार्य लाभले. सदर प्रशिक्षणासाठी राज्यभरातून ३२ शेतकऱ्यांनी आपला सहभाग नोंदवला.

## पुणे कृषि महाविद्यालयाला आंतरमहाविद्यालयीन बास्केटबॉल स्पर्धेचे विजेतेपद

**दि. १ ऑगस्ट, २०२४.** महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी अंतर्गत कृषि महाविद्यालय, पुणे येथे आंतरमहाविद्यालयीन बास्केटबॉल क्रीडा स्पर्धा संपन्न झाल्या. या स्पर्धेमध्ये मुलांचे १८ संघ व मुलींचे ११ संघ सहभागी झाले होते. या स्पर्धेचे उद्घाटन कुलगुरु डॉ. पी.जी. पाटील यांनी केले. यावेळी महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. महानंद माने, विद्यार्थी परिषदेचे उपाध्यक्ष डॉ. विजय तरडे, विद्यार्थी कल्याण





अधिकारी डॉ. प्रमोद पाटील आणि क्रीडा निर्देशक श्री. अभिजित नलवडे उपस्थित होते. या स्पर्धेत कृषि महाविद्यालय, पुणे मुलांच्या संघाने विजेतेपद पटकावले असून कृषि महाविद्यालय, बारामती संघाने उपविजेतेपद पटकावले. तर के.के. वाघ कृषि महाविद्यालय, नाशिक संघाने तृतीय क्रमांक मिळवला. मुलींच्या संघामध्ये डॉ. डी.वाय. पाटील कृषि महाविद्यालय, तळसंदे संघाने विजेतेपद पटकावले, कृषि महाविद्यालय, धुळे संघाने उपविजेतेपद पटकावले तर कृषि महाविद्यालय, बारामती संघाला तृतीय क्रमांक मिळाला. या स्पर्धेचे बक्षिस वितरण डॉ. महानंद माने यांच्या हस्ते झाले. त्यांनी सर्व विजयी संघांचे अभिनंदन केले. यावेळी प्राध्यापक, क्रीडा शिक्षक, खेळाडू आणि विद्यार्थी, विद्यार्थींनी उपस्थित होते.

## कृषि विज्ञान केंद्र, धुळे येथे बांबू लागवड तंत्रज्ञान या विषयावर प्रशिक्षण कार्यक्रम संपन्न





**दि. ७ ऑगस्ट, २०२४.** महात्मा फुले कृषि विद्यापीठ अंतर्गत कृषि विज्ञान केंद्र, धुळे आणि कृषि तंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणा, आत्मा, धुळे यांच्या संयुक्त विद्यमानाने आयोजित बांबू लागवड तंत्रज्ञान हा एक दिवसीय प्रशिक्षण कार्यक्रम कृषि महाविद्यालय, धुळे येथील सभागृहात पार पडला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी धुळे कृषि महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. बबनराव इल्हे होते. या प्रशिक्षण कार्यक्रमास प्रमुख मार्गदर्शक व उद्घाटक म्हणून धुळे घटक कृषि तंत्र विद्यालयाचे प्राचार्य डॉ. राहुल देसले उपस्थित होते. याप्रसंगी जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी श्री. कैलास शिरसाठ, आत्माचे प्रकल्प संचालक श्री. नवनाथ कोळपकर, कृषि विज्ञान केंद्राचे कार्यक्रम समन्वयक डॉ. दिनेश नांद्रे, पीक संरक्षण तज्ञ डॉ. पंकज पाटील, श्री. हितेंद्र सोनावणे, आत्माचे प्रकल्प उपसंचालक श्री. विनय बोरसे, उपविभागीय कृषि अधिकारी श्री. बापू गावित, डॉ. पंकज पाटील, श्री. जगदीश काथेपुरी, श्री. रोहित कडू, श्रीमती. अमृता राऊत, डॉ. आतिश पाटील, डॉ. धनराज चौधरी, श्री. वाल्मिक प्रकाश, श्री. संजय पवार, श्री. संदीप माळी, श्री. उमेश सोनार, श्री. रमाकांत पाटील उपस्थित होते. यावेळी अध्यक्षीय मार्गदर्शन करतांना डॉ. बबनराव इल्हे यांनी बांबू लागवडीचे महत्व अधोरेखीत केले कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. दिनेश नांद्रे यांनी केले. तज्ञांनी बांबू लागवडीबद्दल मार्गदर्शन केले. सदर कार्यक्रमास धुळे जिल्ह्यातील शेतकरी बंधू, भगिनी उपस्थित होते.

## कृषि विज्ञान केंद्र, धुळे येथे रेशीम शेती कृषि पूरक उद्योग या विषयावर प्रशिक्षण कार्यक्रम संपन्न



**दि. २ ऑगस्ट, २०२४.** महात्मा फुले कृषि विद्यापीठ अंतर्गत कृषि विज्ञान केंद्र, धुळे आणि कृषि तंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणा, आत्मा, धुळे यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित रेशीम शेती कृषि पूरक उद्योग हा एक दिवसीय प्रशिक्षण कार्यक्रम कृषि महाविद्यालय, धुळे येथील सभागृहात पार पडला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पशुसंवर्धन व दुग्धशास्त्र विभागाचे प्राध्यापक डॉ. राहुल देसले होते. या प्रशिक्षण कार्यक्रमास प्रमुख मार्गदर्शक व उद्‌घाटक म्हणून नाशिक येथील कृषि सहसंचालक श्री. चलवदे उपस्थित होते. याप्रसंगी धुळे येथील जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी श्री. कैलास शिरसाठ, आत्माचे प्रकल्प संचालक श्री. नवनाथ कोळपकर, कीटकशास्त्र विभागाचे प्राध्यापक डॉ. घनश्याम काबरा, कृषि विज्ञान केंद्राचे कार्यक्रम समन्वयक डॉ. दिनेश नांद्रे, पीक संरक्षणाचे शास्त्रज्ञ डॉ. पंकज पाटील, श्री. हितेंद्र सोनावणे, आत्माचे प्रकल्प उपसंचालक श्री. विनय बोरसे, उपविभागीय कृषि अधिकारी श्री. बापू गावित, श्रीमती. अमृता राऊत, डॉ. आतिश पाटील, डॉ. धनराज चौधरी, श्री. वाल्मिक प्रकाश व श्री. संजय पवार उपस्थित होते. यावेळी तज्ञांनी रेशीम शेतीच्या विविध बाबींवर मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. धनराज चौधरी यांनी केले तर आभार श्रीमती अमृता राऊत यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी कृषि विज्ञान केंद्र धुळे येथील शात्रज्ञ, अधिकारी, कर्मचारी तसेच आत्मा, धुळे, कृषि विभाग, धुळे येथील अधिकारी, कर्मचारी यांचे सहकार्य लाभले. सदर कार्यक्रमास धुळे जिल्ह्यातील २५० शेतकरी बंधू, भगिनी उपस्थित होते.

## कृषि विज्ञान केंद्र, धुळे येथे एक पेड मा के नाम कार्यक्रम संपन्न



**दि. २९ ऑगस्ट, २०२४.** भारताच्या माननीय पंतप्रधानांनी ५ जून, २०२४ रोजी जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधून आईच्या नांवाने एक पेड मा के नाम ग्लोबल कॅम्पेन सुरू केले आहे. या जागतिक अभियानाचा एक भाग म्हणून सप्टेंबर २०२४ पर्यंत देशभरात ८० कोटी रोपे आणि मार्च २०२५ पर्यंत १४० कोटी रोपे लावण्याचा प्रयत्न केला जात असल्याची माहिती पर्यावरण, वन आणि हवामान बदल मंत्रालयाने दिली. पर्यावरण, वन आणि हवामान बदल मंत्रालयाने असोला भाटी वन्यजीव अभयारण्यात २० जून, २०२४ रोजी वृक्षारोपणचा उपक्रम सुरू

केला, ज्यामध्ये व्यक्तींनी त्यांच्या आईच्या सन्मानार्थ वृक्षारोपण केले. या मोहिमेचा एक भाग म्हणून कृषि व शेतकरी कल्याण मंत्रालयातर्फे मोहिम राबविण्यात येत आहे. भारत सरकारच्या माननीय कृषिमंत्र्यांच्या उपस्थितीत या कार्यक्रमांतर्गत मंत्रालय, आयएआरआय कॅम्पसमध्ये सुमारे १ एकर जागेत मातृ वन स्थापित करणार असून जिथे माननीय कृषिमंत्री आणि मंत्रालयाचे अधिकारी/कर्मचारी यांनी रोपे लावली. याचेच औचित्य साधत कृषि विज्ञान केंद्रात एक पेड मा के नाम शेतकऱ्यांच्या उपस्थितीमध्ये १०० रोपांची लागवड करण्यात आली तसेच कृषि व शेतकरी कल्याण मंत्रालयांतर्गत ८०० हून अधिक संस्था सहभागी होऊन या कार्यक्रमात ३००० ते ४००० रोपांची लागवड केली. तरी जास्तीत जास्त युवक, युवती, महिला, शेतकरी यांनी या अभियांनामध्ये सहभाग घ्यावा असे आवाहन कृषि विज्ञान केंद्राचे कार्यक्रम समन्वयक डॉ. दिनेश नांद्रे यांनी केले.

## नागपूर येथील केंद्रीय कापूस संशोधन संस्थेच्या शास्त्रज्ञांची धुळे कृषि विज्ञान केंद्रास भेट




**दि. ३१ ऑगस्ट, २०२४.** भारतीय कृषि अनुसंधान संस्था, नवी दिल्ली अंतर्गत केंद्रीय कापूस संशोधन संस्था, नागपूर येथील प्रमुख शास्त्रज्ञ डॉ. जयंत मेश्राम आणि शास्त्रज्ञ डॉ. शिवाजी ठुबे यांनी धुळे कृषि विज्ञान केंद्राला भेट दिली. या भेटीदरम्यान डॉ. जयंत मेश्राम आणि डॉ. शिवाजी ठुबे यांनी कृषि विज्ञान केंद्राच्या विविध उपक्रमांची माहिती घेतली. कृषि विज्ञान केंद्राच्या माध्यमातून धुळे जिल्ह्यातील चार तालुक्यांमध्ये राबविण्यात येणाऱ्या विविध विस्तार कार्यक्रमांचा आढावा घेतला. केंद्रीय कृषिमंत्र्यांच्या आदेशानुसार भारतातील सर्व कृषि विज्ञान केंद्रांचा आढावा घेण्याची सार्वत्रिक मोहीम सुरू आहे, त्याच अंतर्गत ही भेट झाली. डॉ. जयंत मेश्राम आणि डॉ. शिवाजी ठुबे यांनी कृषि विज्ञान केंद्राच्या विविध उपक्रमांना भेटी दिल्या. यावेळी त्यांनी सर्व प्रक्षेत्राची पाहणी करून शास्त्रज्ञांशी संवाद साधला. डॉ. दिनेश नांद्रे यांनी मागील तीन वर्षातील विविध विस्तार कार्यांचे सादरीकरण केले. दुपारच्या सत्रात त्यांनी कृषि विज्ञान केंद्राच्या लाभार्थी शेतकऱ्यांच्या शेतीला भेटी दिल्या. सदरील भेटी दरम्यान धुळे जिल्ह्यातील प्रगतशील शेतकरी, महिला शेतकरी, शेतकरी शास्त्रज्ञ मंचाचे शेतकरी उपस्थित होते. डॉ. जयंत मेश्राम आणि डॉ. शिवाजी ठुबे यांनी कृषि विज्ञान केंद्राच्या कार्यप्रणालीवर समाधान व्यक्त केले.

## सातारा जिल्ह्यातील चिंचनेर निंब येथे ऊस पीक परिसंवाद संपन्न

**दि. २९ ऑगस्ट, २०२४.** महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी अंतर्गत असलेल्या सातारा जिल्ह्यातील बोरगांव येथील कृषि विज्ञान केंद्र व नवी दिल्ली येथील कृषि जागरण मिडीया आणि कृषि विभाग, सातारा यांच्या संयुक्त विद्यमाने चिंचनेर निंब येथे समृध्द किसान महोत्सव अंतर्गत ऊस पीक परिसंवाद व प्रगतशिल शेतकऱ्यांचा सन्मान कार्यक्रम संपन्न झाला. या कार्यक्रमासाठी धानुका ॲग्री टेक व महिंद्रा ट्रॅक्टर्स हे प्रायोजक होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कृषि विज्ञान केंद्राचे कार्यक्रम समन्वयक डॉ. महेश बाबर, मांजरी येथील व्हीएसआयचे माजी शास्त्रज्ञ डॉ. सुरेश माने, पाडेगांव येथील ऊस संशोधन केंद्राचे शास्त्रज्ञ डॉ. सुरज नलवडे, कृषि विज्ञान केंद्राचे शास्त्रज्ञ श्री. भुषण यादगीरवार, श्री. सागर सकटे, डॉ. स्वाती गुर्वे व डॉ. कल्याण बाबर, पाडेगांव येथील कनिष्ठ संशोधन सहाय्यक डॉ. किरण ओंबासे व मंडल कृषि अधिकारी श्री. युवराज काटे उपस्थित होते. याप्रसंगी शास्त्रज्ञांनी मार्गदर्शन केले. यावेळी परिसरातील प्रगतीशिल व नाविन्यपुर्ण बाबींचा अवलंब करणाऱ्या



महिला शेतकरी तसेच शेतकरी उत्पादक कंपनी व बचत गटांना प्रशस्तीपत्र देवुन गौरवण्यात आले. यावेळी शेतकरी व महिला मोठया संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन श्री. संग्राम पाटील यांनी व आभार प्रदर्शन श्री. सागर सकटे यांनी केले.

## कोल्हापूर कृषि महाविद्यालयात रॅगिंग प्रतिबंधात्मक सप्ताह उत्साहात संपन्न







**दि. २१ ऑगस्ट, २०२४.** महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी अंतर्गत असलेल्या राजर्षि छत्रपती शाहु महाराज कृषि महाविद्यालय, कोल्हापूर येथे विद्यापीठ अनुदान आयोग, भारतीय कृषि अनुसंधान परिषद, नवी दिल्ली यांच्या निर्देशानुसार दि. १२ ऑगस्ट या रॅगिंग प्रतिबंधात्मक दिवसापासून कृषि महाविद्यालयात विद्यार्थ्यांमध्ये रॅगिंग विरोधी जागृती करण्यासाठी काव्यलेखन व वाचन, गीतगायन, निबंधलेखन, पथनाट्य सादरीकरण, वादविवाद स्पर्धा यासोबतच भित्तीपत्रक सादरीकरण व रांगोळी रेखाटन अशा विविध उपक्रमांचे व स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कृषि महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. रविंद्र बनसोड होते. याप्रसंगी विद्यार्थी परिषदेचे उपाध्यक्ष डॉ.शैलेंद्र कांबळे, विद्यार्थी कल्याण अधिकारी इंजी. अजय देशपांडे, कुलमंत्री व रॅगिंग प्रतिबंधात्मक सप्ताहाचे समन्वयक डॉ. ऋषिकेश सोनवणे व उपकुलमंत्री डॉ. रेणुका शिंदे उपस्थित होते. यावेळी मार्गदर्शन करतांना डॉ. रविंद्र बनसोड म्हणाले की रॅगिंग म्हणजे मानसिक हिंसा असून तो एक सामाजिक धोका आहे आणि शैक्षणिक संस्थांच्या आवारात अशा अमानवीय व्यवहारांना थारा नाही. या स्पर्धांमधील यशस्वी विद्यार्थ्यांसाठी पारितोषिक वितरणाचा कार्यक्रम या सप्ताहाच्या समारोपप्रसंगी झाला.

## कृषि महाविद्यालय, हाळगाव येथे राष्ट्रीय ॲन्टी रॅगिंग दिवस साजरा

**दि. १२ ऑगस्ट, २०२४.** महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी अंतर्गत असलेल्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कृषि महाविद्यालय, हाळगाव येथे राष्ट्रीय ॲन्टी रॅगिंग दिवस साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी हाळगांव कृषि महाविद्यालयाचे सहयोगी



अधिष्ठाता डॉ. अनिल काळे होते. यावेळी विद्यार्थी परिषद उपाध्यक्ष डॉ. दत्तात्रय सोनावणे, विद्यार्थी कल्याण अधिकारी डॉ. सखेचंद अनारसे, वसतिगृह कुलमंत्री डॉ. मनोज गुड, उपकुलमंत्री डॉ. प्रेरणा भोसले, डॉ. नजिर तांबोळी, डॉ. महेश निकम, डॉ. राहुल विधाते, डॉ. प्रणाली ठाकरे आणि प्रा. अर्चना महाजन उपस्थित होते. यावेळी मार्गदर्शन करताना डॉ. अनिल काळे यांनी महाविद्यालयाच्या परिसरात शिस्तीचे पालन करून कोणतेही बेजबाबदार कृत्य न करण्यासाठी सूचित केले तसेच येणाऱ्या शैक्षणिक वर्षांत महाविद्यालयात नव्याने येणाऱ्या विद्यार्थ्यांचे स्वागत करण्यास सांगितले. कार्यक्रमाच्या प्रास्ताविकातून डॉ. अनारसे यांनी रॅगिंग म्हणजे काय, ॲन्टी रॅगिंग कायदा तयार करण्यामागची पार्श्वभूमी समजावून सांगितली. डॉ. गुड यांनी वसतिगृहात शिस्तीचे पालन करून खेळीमेळीच्या वातावरणात वास्तव्य करावयास संबोधित केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. अर्चना महाजन तर आभार डॉ. प्रणाली ठाकरे यांनी मानले. या कार्यक्रमाला महाविद्यालयाचे शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## कृषि महाविद्यालय, मुक्ताईनगर येथे ई–पीक पाहणी प्रशिक्षण व महसूल पंधरवाडा कार्यक्रमाचे आयोजन



**दि. ७ ऑगस्ट २०२४.** महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी अंतर्गत असलेले कृषि महाविद्यालय, मुक्ताईनगर येथे तहसीलदार श्री. गिरीष वखारे यांच्या उपस्थितीत ई–पीक पाहणी प्रशिक्षण व महसूल पंधरवडा कार्यक्रम संपन्न झाला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कृषि महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. संदीप पाटील होते. याप्रसंगी डॉ. अविनाश कोळगे, डॉ. बाळासाहेब रोमाडे, डॉ. रियाज शेख, डॉ. नामदेव धुर्वे व तलाठी श्री. महादेव दाणी उपस्थित होते. अध्यक्षीय मार्गदर्शनात डॉ. संदिप पाटील यांनी लोकशाहीमध्ये मतदानाला असलेले महत्व तसेच प्रशिक्षणाचा जास्तीत जास्त शेतकऱ्यांना विद्यार्थ्यांच्या मदतीने कसा फायदा करून देता येईल याबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. श्री. वखारे यांनी कृषि विषयाचे शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांना शेतकऱ्यांसाठी असलेल्या शासनाच्या विविध योजनांबद्दल मार्गदर्शन केले. यावेळी श्री. महादेव दाणी यांनी ई–पीक पाहणी बद्दल मार्गदर्शन केले. सूत्रसंचालन डॉ. तुषार भोसले तर आभार डॉ. सागर बंड यांनी मानले.

## कृषि महाविद्यालय, मुक्ताईनगर येथे अँटी रॅगिंग दिवस साजरा



**दि. १२ ऑगस्ट २०२४.** महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी अंतर्गत असलेल्या कृषि महाविद्यालय, मुक्ताईनगर येथे अँटी रॅगिंग दिवसाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष व कृषि महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. संदीप पाटील यांनी विद्यार्थ्यांना अँटी रॅगिंग अवेअरनेस संदर्भात मार्गदर्शन केले. यावेळी महाविद्यालयाचे सहाय्यक कुलसचिव श्री. प्रशांत नागे, कूलमंत्री डॉ. आर. डी. चौधरी, डॉ. आर. एस. शेख, प्रा. एन. जी. धूर्वे, प्रा. आर. एस. बागुल, डॉ. कुशल ढाके, डॉ. एम. आर. पालवे, श्रीमती बेलसरे उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. अविनाश कोलगे यांनी तसेच कार्यक्रमाचे विस्तृत रूपरेषा डॉ. सागर बंड व सूत्रसंचालन डॉ. तुषार भोसले यांनी आणि आभार डॉ. रवींद्र जाधव यांनी मानले. यावेळी महाविद्यालयातील विद्यार्थी, शिक्षक आणि कर्मचारी उपस्थित होते.

## कृषि महाविद्यालय, मुक्ताईनगर येथे हर घर तिरंगा कार्यक्रम संपन्न



**दि. १२ ऑगस्ट २०२४.** महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी अंतर्गत असलेल्या कृषि महाविद्यालय, मुक्ताईनगर, जि. जळगांव येथे हर घर तिरंगा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी कार्यक्रमासाठी मा. उच्च व तंत्र शिक्षण मंत्री श्री. चंद्रकांत पाटील यांचे थेट ऑनलाईन यू ट्यूबद्वारे मार्गदर्शन केले. याप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष व कृषि महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. संदीप पाटील यांनी विद्यार्थ्यांना हर घर तिरंगा कार्यक्रमाचे उद्दिष्ट आणि महत्त्व या संदर्भात मार्गदर्शन केले. यावेळी महाविद्यालयाचे सहाय्यक कुलसचिव श्री. प्रशांत नागे, डॉ. ए.के. कोळगे, डॉ. आर.डी. चौधरी, डॉ. जी.पी. देशमुख, डॉ. आर.एस. शेख, प्रा. आर.एस. बागुल, डॉ. सागर बंड, डॉ. तुषार भोसले, डॉ. रवींद्र जाधव डॉ. एम.आर. पालवे, श्री. अमोल तेलोरे, श्री. विजय पाटील, श्री. गणेश गावंडे, श्रीमती. माधुरी बेलसरे, श्री. विवेक राऊत, श्री. संतोष गवई, श्री. सिद्धार्थ काळे उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्री. एन.जी. धूर्वे यांनी तर आभार प्रदर्शन डॉ. कुशल ढाके यांनी केले. यावेळी महाविद्यालयातील सर्व विद्यार्थी, शिक्षक आणि कर्मचारी उपस्थित होते.

## जळगांव जिल्ह्यात तांदलवाडी येथे शेतकरी मेळाव्याचे आयोजन



**दि. १३ ऑगस्ट २०२४.** महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी अंतर्गत असलेल्या कृषि महाविद्यालय, मुक्ताईनगर, जि. जळगांव येथे ग्रामीण कृषि जागरूकता आणि कृषि औद्योगिक कार्यानुभव कार्यक्रमाचे कृषिदुत आणि कृषिकन्या यांनी तांदलवाडी येथे शेतकरी मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कृषि महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. संदीप पाटील होते. शेतकरी मेळाव्याचे प्रमुख पाहुणे म्हणुन रावेर लोकसभा प्रमुख श्री. नंदकिशोर महाजन व कृषि भूषण शेतकरी श्री. प्रेमानंद महाजन उपस्थित होते. याप्रसंगी डॉ.अविनाश कोळगे, डॉ. गणेश देशमुख, डॉ. रियाज शेख, जैन इरिगेशन सिस्टीम लिमिटेड येथील श्री.राहुल भारंबे, प्रा. नामदेव धुर्वे व कार्यक्रम अधिकारी डॉ. सागर बंड उपस्थित होते. यावेळी अध्यक्षीय मार्गदर्शन करतांना डॉ. संदीप पाटील यांनी शेतकऱ्यांना आधुनिक शेतीचे ज्ञान व आधुनिक शेती काळाची गरज, आधुनिक शेती पद्धती यावर मार्गदर्शन केले. याप्रसंगी शास्त्रज्ञांना विविध विषयांवर मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रथमेश कांबळे, प्रास्ताविक अश्विनी पाटील व आभार दीक्षा गवई यांनी मानले.

## जिल्हा विस्तार केंद्र, कृषि संशोधन केंद्र, निफाड येथे अनुसूचित जाती उपयोजना अंतर्गत कृषि अवजारे वाटप कार्यक्रम संपन्न



**दि. १ ऑगस्ट, २०२४.** महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी अंतर्गत जिल्हा विस्तार केंद्र, नाशिक, कृषि संशोधन केंद्र, निफाड, जि. नाशिक येथे अनुसूचित जाती उपयोजना प्रकल्पांतर्गत अवजारे वाटप कार्यक्रम संपन्न झाला. जिल्हा विस्तार केंद्र, नाशिक यांचेमार्फत निफाड तालुक्यातील एकूण ३० अनुसूचित जातीच्या शेतकऱ्यांना कृषि अवजारे वाटप कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. सदर कृषि अवजारे वाटप कार्यक्रमात निवड केलेल्या शेतकऱ्यांना कृषि विद्यापीठाने निर्मिती केलेले हात कोळपे, भुईमुग शेंगा फोडण्याचे यंत्र, नारळ सोलणी यंत्र आणि कृषिदर्शनी याचे प्रती लाभार्थी १ संच याप्रमाणे निफाड येथील कृषि संशोधन केंद्राचे गहू विशेषज्ञ डॉ. सुरेश दोडके, जिल्हा विस्तार केंद्राचे प्रमुख डॉ. योगेश पाटील आणि निफाड येथील प्रगतीशील शेतकरी श्री हेमंत राठी यांचे उपस्थितीमध्ये वाटप करण्यात आले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी कृषि संशोधन केंद्र, निफाडचे अधिकारी व कर्मचारी यांचे सहकार्य लाभले.

## नाशिक जिल्ह्यातील कोटमगाव येथे सोयाबीन पीक परिसंवाद संपन्न



**दि. १६ ऑगस्ट, २०२४.** कृषि विज्ञान केंद्र, नाशिक आणि जिल्हा विस्तार केंद्र, कृषि संशोधन केंद्र, निफाड यांचे संयुक्त विद्यमाने मौजे कोटमगाव-लासलगाव, ता. निफाड येथे सद्य:स्थितीत सोयाबीन पीक व्यवस्थापन यावर शेतकरी परिसंवाद कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कृषि विज्ञान केंद्र, नाशिक यांचे मार्फत या गावात एकूण २२५ शेतकऱ्यांच्या शेतावर (२२५ एकर क्षेत्र) कृषि विद्यापीठाच्या फुले दुर्वा या सोयाबीन वाणाचे आद्यरेखा प्रात्यक्षिक घेण्यात आलेले आहे. यावेळी कृषि संशोधन केंद्र, निफाड येथील मृद शास्त्रज्ञ डॉ. योगेश पाटील यांनी सोयाबीन पिकाचे गुणवत्तापूर्वक अधिक उत्पादन साध्य करण्यासाठी सोयाबीन पिकाच्या वाढीच्या निरनिराळ्या अवस्थेत विविध अन्नद्रव्यांचा वापर कसा करावा तसेच पिकावर सूक्ष्म अन्नद्रवयाच्या कमतरता दुर करण्यासाठी विविध उपयायोजना याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. किटकशास्त्रज्ञ तथा प्रभारी गहु विशेषज्ञ प्रा. भालचंद्र म्हस्के यांनी सध्या सोयाबीन पिकावर दिसून येते असलेल्या पाने खाणारी अळी आणि चक्री भुंगा या किडींचे एकात्मिक पद्धतिने कसे व्यवस्थापन करावे याविषयी माहिती सांगितली. पीक रोगशास्त्रज्ञ डॉ. भानुदास गमे यांनी सोयाबीन पिकातील जीवाणू खतांचे महत्व, बीजप्रक्रिया आणि सोयाबीन पिकावरील विविध रोगांचे सामुहिक तसेच एकात्मिक पद्धतिने कसे नियंत्रण करावे यावर सखोल मार्गदर्शन केले. परिसंवादाच्या प्रास्ताविकात विषय विशेषज्ञ (कृषि विद्या) डॉ. प्रकाश कदम यांनी कोटमगाव परिसरात राबविण्यात आलेल्या प्रात्यक्षिकांची माहिती अधोरेखित केली. परिसंवादात कोटमगाव परिसरातील शेतकरी आणि ग्रामस्थ मोठ्या संख्यने उपस्थित होते.

## कृषि तंत्र विद्यालय, कसबे डिग्रज येथे अण्णाभाऊ साठे जयंती साजरी



**दि. १ ऑगस्ट, २०२४.** महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी अंतर्गत असलेल्या कृषि तंत्र विद्यालय, कसबे डिग्रज, जि. सांगली येथे कथा, कादंबरी, लोकनाट्य, नाटक, पटकथा, लावणी, पोवाडे, प्रवासवर्णन अशा वेगवेगळ्या साहित्यप्रकारांतील लेखन केलेले ख्यातनाम मराठी साहित्यिक लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी झालेल्या कार्यक्रमात विद्यालयाचे

प्राचार्य डॉ. मनोज माळी यांचे हस्ते लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यावेळी डॉ. माळी आपल्या भाषणात म्हणाले की संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत अण्णाभाऊ साठे यांनी स्वतःला झोकून दिले होते. त्यांच्या शाहिरीत लावणी, पोवाडे, गीते, लोकनाटये आदींचा समावेश होता. यावेळी द्वितीय वर्षाच्या विद्यार्थीनी अनुराधा पाटील व सुप्रिया चौगुले या सावित्रीच्या लेकींनी तसेच नागेश राठोड, सुमित महिंद, रायगोंडा पाटील, गणेश माळी, श्रेयस साळवेकर, श्रावण चव्हाण, यशवंत पारसे, विजय माने, सुपार्श्व घाट यांनी अण्णाभाऊ साठे यांच्या शैक्षणिक व सामाजिक कार्याची उजळणी सर्व उपस्थित विद्यार्थी, विद्यार्थिनी यांना करून दिली. श्रीमती शर्मिला वाटकर यांनी प्रास्ताविक तर प्रज्वल गागरे यांनी आभार व्यक्त केले.

## सप्टेंबर महिन्यातील कामांचा तपशील

### ऊस

- ६ ते ८ आठवडे वयाच्या आडसाली लागणीस को ८६०३२ जातीसाठी शिफारशीत (५००:२००:२०० किलो नत्र, स्फुरद, पालाश) खतमात्रेच्या ४० टक्के नत्र खताची दुसरी मात्रा देण्यासाठी ४३४ किलो युरिया (२०० किलो नत्र) तर इतर जातीसाठी शिफारशीत (४००:१७०:१७० किलो नत्र, स्फुरद, पालाश) खतमात्रेच्या ४० टक्के नत्र खताची दुसरी मात्रा देण्यासाठी ३४७ किलो युरिया (१६० किलो नत्र) प्रती हेक्टरी वापरावी. तसेच सदरची खतमात्रा देताना ६ किलो युरियासाठी १ किलो या प्रमाणात निंबोळी पेंडीची भुकटी चोळून द्यावी.
- आडसाली उसाची लागण केलेल्या क्षेत्रात उगवण विरळ झालेल्या ठिकाणी रोप लागण पध्दतीने वेळीच नांग्या भरुन घ्याव्यात.
- पूर्वहंगामी ऊस लागणी करीता पूर्व मशागतीची कामे पूर्ण करा. मशागत केलेल्या क्षेत्रात हेक्टरी २५ टन शेणखत किंवा कंपोष्ट खत वापरावे. यापैकी अर्धे शेणखत (१२.५ टन) दुसऱ्या नांगरटीपूर्वी व अर्धे शेणखत (१२.५ टन) लागणीपूर्वी सरी सोडण्यापूर्वी द्यावे.
- उसाच्या पानांवरील तांबेरा व पोक्का बोईंग या रोगांच्या नियंत्रणाकरिता ३० ग्रॅम मँकोझेब प्रति १० लिटर किंवा १० ग्रॅम कार्बेन्डॅझीम प्रति १० लिटर पाण्यात मिसळून या बुरशीनाशकाची १५ दिवसाच्या अंतराने स्टिकर वापरुन फवारणी करावी.
- आडसाली ऊस ६ ते ८ आठवडयाचा असताना व्दिदलवर्गीय तण नियंत्रणासाठी २,४–डी या तणनाशकाचा १.२५ किलोग्रॅ ५०० लिटर पाण्यात मिसळून प्रती हेक्टरी जमिनीवर फवारणीसाठी वापर करावा. फवारणी करताना जमीन तुडवू नये. फवारणीनंतर तीन ते चार दिवस त्या क्षेत्रामध्ये कोणतीही मशागत करु नये.
- आडसाली ऊसासाठी सप्टेंबरच्या चौथ्या आठवडयात संजीवकांच्या पहिल्या फवारणीसाठी हेक्टरी १५० लिटर पाणी लागेल. त्याकरिता जी.ए. ३ जिब्रेलिक ॲसीड (४० पीपीएम) ६ ग्रॅम, ६ बी.ए. : ६ बेन्झिल ॲडेनाईन (४० पीपीएम) ६ ग्रॅम, १५०० ग्रॅम १९:१९:१९, ३७५ ग्रॅम चिलेटेड सुक्ष्म अन्नद्रव्य व ७५० ग्रॅम सिलिकॉन (सिलिसायलिक ॲसिड) एकत्रित करून उसाच्या पानावर फवारणी करावी.
- शेतातील पावसाचे साठलेले पाणी त्वरीत शेताबाहेर काढून पाण्याचा निचरा होण्यासाठी उताराच्या बाजूने चर काढा.
- ऊस पिकावर येणाऱ्या पोक्का बोंईग रोगाच्या प्रभावी नियंत्रणासाठी, रोगाचा प्रादुर्भाव दिसून आल्यानंतर ३० ग्रॅम मँकोझेब प्रति १० लिटर पाण्यात मिसळून या बुरशीनाशकाच्या तीन फवारण्या १२ दिवसांच्या अंतराने घेण्याची शिफारस करण्यात येत आहे.
- ऊसावरील तांबेरा व तपकिरी ठिपके रोगाच्या प्रभावी व्यवस्थापनासाठी ॲझोऑक्सीस्ट्रॉबीन १८.२% + डायफेनकोन्याझोल ११.४% एस.सी. ०.१% (१० मिली प्रति १० लिटर पाणी) या संयुक्त बुरशीनाशकाच्या तीन फवारण्या रोगाच्या प्राथमिक लक्षणे दिसून आल्यानंतर १५ दिवसांच्या अंतराने करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

### बागायती कापूस

- पांढऱ्या माशीचा प्रादुर्भाव समजण्यासाठी व नियंत्रणासाठी पिवळे चिकट सापळे (२५ प्रति हेक्टर) शेतात लावावे.
- रस शोषणाऱ्या किडींचा प्रादुर्भाव आर्थिक नुकसान पातळीपेक्षा जास्त दिसून आल्यास पायरीप्रोक्झीफेन १० ई.सी. २० मिली. किंवा बुप्रोफेझीन २५ मिली. किंवा फ्लोनिकॅमिड ५० डब्ल्यू.जी. २ ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारावे.
- पांढऱ्या माशीचा प्रादुर्भाव आर्थिक नुकसान पातळीपेक्षा जास्त असल्यास पायरीप्रोक्झीफेन १० ई.सी. २० मिली प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारावे.

- कामगंध सापळ्यामध्ये सतत २-३ दिवस, ८-१० गुलाबी बोंड अळीचे पतंग दिसून आल्यास प्रोफेनोफॉस ५० ई. सी. प्रमाणे २० मिली किवा लम्वडा सायहॅलोथ्रीन ५ ई. सी. १० मिली प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी.
- बुरशीजन्य करपा रोगाच्या नियंत्रणासाठी पायरीक्लोस्ट्रोबीन २० डब्ल्यू. जी. १० ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी किंवा मेटीराम ५.५% + पायरॅब्लोरोस्टोवीन ५% डब्ल्यु.जी. २० ग्रॅम प्रति १० ली. पाण्यात फवारणी करावी.
- मॅग्नेशिअम सुक्ष्म अन्नद्रव्ये २०ते ३० कि.ग्रॅम प्रति हेक्टरी जमिनीत द्यावे. लाल्या रोगाचा प्रादुर्भाव आढळल्यास २ टक्के डायअमोनियम फॉस्फेट खताचे द्रावण १५ दिवसांच्या अंतराने दोन वेळेस पिकावर फवारावे.
- गुलाबी बोंड अळीग्रस्त डोमकळ्या तोडून आतील अळीसह नष्ट कराव्यात.
- कपाशीच्या शेतात पक्षांना बसण्यासाठी हेक्टरी किमान २५ पक्षीथांबे उभे करावेत, म्हणजे पक्षी त्यावर बसून शेतातील अळ्या टिपून खातील.

### हरभरा व्यवस्थापन

- हरभरा पेरणीपूर्वी खोल नांगरट करावी व कुळवाच्या २-३ पाळ्या देऊन शेत पेरणीस तयार ठेवावे.
- २० सप्टेंबर ते १० ऑक्टोबर पर्यंत जिरायती हरभरा बीजप्रकिया करुन पेरावा (२ ग्रॅम थायरम + २ ग्रॅम बाविस्टीन/ किलो बियाणे किंवा ५ ग्रॅम ट्रायकोडर्मा व यानंतर २५० ग्रॅम रायझोबियम / १० किलो बियाणे ).
- शिफारशीत खत मात्रा पेरणीवेळी द्यावी.

### भात

- पाणी व्यवस्थापन भात पिकाच्या योग्य वाढीकरिता व अधिक उत्पादनाकरीता भात खाचरात पाण्याची योग्य पातळी राखणे आवश्यक आहे. पिकाच्या वाढीच्या अवस्थेनुसार भात खाचरातील पाण्याची पातळी पुढीलप्रमाणे असावी. फुलोरा व दाणे भरण्याच्या अवस्थेत १० सें.मी.
- पीक संरक्षण तपकिरी तुडतुड्यांच्या नियंत्रणासाठी इमिडॅक्लोप्रिड २० एस.एल. (१२५ मिली) किंवा थायोमिथॅक्झाम २५ डब्लु.जी. (१०० ग्रॅम) किंवा इथोफेनफॉस १० ई.सी. (५०० मिली) किंवा ॲसिफेट ५० डब्ल्यु.पी.(९५० ग्रॅम) किंवा बुप्रोफेजीन २५ एस.सी. (१००० मिली) प्रती हेक्टरी फवारावे.

### कडधान्य पिके

- मूग आणि उडिद पिकाच्या पक्वतेनुसार काढणी व मळणी करावी.
- तूर पीक फुलोऱ्यात असताना किड व रोगांपासून संरक्षण करावे. यासाठी ५ टक्के निंबोळी अर्काची पहिली फवारणी करावी.

### नाचणी पीक

### पीक संरक्षण

- लष्करी अळी व पाने खाणारी अळी : खरीपात ३० ते ८० टक्के नुकसान. गवताळ-डोंगरी भागात जास्त प्रादुर्भाव, बंदोबस्त शेतातील/बांधावरील गवत काढून टाकावे.
- मावा - तुडतुडे : प्रादुर्भाव सुरुवातीच्या काळात जास्त रस शोषून घेतात. कर्बग्रहण मंदावते.
- करपा रोग : प्रादुर्भाव दिसून येताच कार्बडेन्झीम (बावीस्टीन) ०.१ टक्के क्रियाशील घटकाप्रमाणे पाण्यात मिसळून फवारणी करावी.
- पावसाचा ताण पडल्यास संरक्षित पाणी देणे.

### बाजरी

- पिकाची काढणी व मळणी करावी. धान्य उन्हात चांगले वाळवून साठवून ठेवावेत.

मफुकृवि ई वार्ता
ऑगस्ट २०२४

वर्ष :४, अंक क्रं. : ४३, जुलै, २०२४ महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी

### सोयाबीन

- पेरणीनंतर ७५ ते ८० दिवसानी शेंगेवरील करपा नियंत्रण आणि बियाणाची प्रत सुधारणे याकरिता शिफारशीत बुरशीनाशकाची फवारणी करावी.
- पीक पक्वतेनंतर पिकाची काढणी व मळणी करावी. मळणी करताना मळणी मशीनच्या शाफ्टची गती ३०० ते ४०० आरपीएम असावी. म्हणजे सोयाबीनच्या उगवणक्षमतेवर अनिष्ट परिणाम होणार नाही.

### रब्बी ज्वारी

- पहिला पंधरवडा – शेतजमीन पेरणीसाठी तयार करावी
- सप्टेंबर दुसरा पंधरवडा – खालील शिफारशीनुसार ज्वारीची पेरणी करावी.
- बीजप्रक्रिया– पेरणीपूर्वी बियाण्यास गंधक ४ ग्रॅम किंवा थायरम ३ ग्रॅम प्रति १ किलो व अॅझोटोबॅक्टर किंवा अॅझोस्पिरिलियम किंवा पीएसबी १० किलो बियाण्यास २५० ग्रॅमप्रमाणे जिवाणू संवर्धकाची बीजप्रक्रिया करावी.
- बियाण्याचे प्रमाण व पेरणीचे अंतर– पेरणीसाठी हेक्टरी १० किलो बियाणे वापरावे. दोन ओळीतील अंतर ४५ सें. मी. व दोन रोपातील अंतर १५ सें. मी. ठेवावे.
- खोडमाशी नियंत्रण : पेरणीनंतर ७–८ दिवसांनी क्युनॉलफॉस २५ ईसी प्रवाही ७५० मिली व ५०० लीटर पाणी प्रती हेक्टरी फवारणी करावी.

### फळबाग व्यवस्थापन

- **डाळिंब–** पक्व फळांची काढणी करावी. फळांवरील रस शोषणाऱ्या पतंगाचे नियंत्रण करावे.
- **सिताफळ–** डोळे पडलेल्या फळांची काढणी करावी.
- **बोर–** भुरी व फळे पोखरणाऱ्या माशीवर नियंत्रण करावे.
- **अंजीर–** मध्यम ते हलकी छाटणी करावी.
- **जांभूळ–** बाग ताणावर सोडावी.
- **कागदी लिंबू –** शिफारशीत खतमात्रेच्या ३० टक्के नत्राची मात्रा द्यावी. हस्त बहाराचे नियोजनासाठी १००० पीपीएम सायकोसील (सीसीसी) ची फवारणी करावी.
- **मोसंबी व कागदी लिंबू –** रस शोषणारा पतंग : गंध सापळ्याचा वापर करावा (२०० मिली क्लोरोपायरीफॉस + १ किलो गुळ + १ लि. मोसंबीचा रस + १० लि. पाणी मिसळून त्यामधून प्रत्येकी ५०० मिली द्रावण घेऊन हेक्टरी १५–२० सापळे लावावे.)
- **कँकर / खैऱ्या रोग** : कॉपर ऑक्सीक्लोराईड ३० ग्रॅम प्रति १० लि. पाण्यातून फवारणी करावी.

### भाजीपाला व्यवस्थापन

- कांदा पिकामधील तण नियंत्रणासाठी लागवडीपासून २१ दिवसांनी रासायनिक तणनाशकाची फवारणी करावी.
- फवारणीवेळी शेतामध्ये वापसा स्थिती असावी याची काळजी घ्यावी.
- कांदा पीक एक महिन्याचे झाल्यावर नत्र खताचा पहिला हप्ता द्यावा.
- कांदा पिकावर येणारा करपा व फुलकिडे यांचे नियंत्रण करावे.
- खरीप टोमॅटो, वांगी, मिरची, भेंडी, गवार व वेलवर्गीय भाजीपाला तसेच कोबी व फ्लॉवर पिकामध्ये खांदणी करून झाडांना भर लावावी.
- टोमॅटो पिकास ताटी पध्दतीने आधार द्यावा.
- वेलवर्गीय भाजीपाला पिकांना मंडप अथवा ताटी पध्दतीने आधार द्यावा.
- खरीप भाजीपाला पिकांना नत्र खताचा दुसरा हप्ता द्यावा.
- खते देण्यापूर्वी पीक खुरपून स्वच्छ करावे.
- आवश्यकतेनुसार पीक संरक्षणाचे उपाय करावे.
- जास्त पाऊस किंवा सततच्या ढगाळ हवामानामुळे पिकांवर सुध्दा अन्नद्रव्यांच्या कमतरतेची लक्षणे दिसताच सुक्ष्म अन्नद्रव्यांची फवारणी करावी.

- रसशोषून घेणाऱ्या किडींपासून विषाणू जन्य रोगांचा प्रसार होतो अशा किडींचे वेळीच नियंत्रण करावे.
- पीक संरक्षणाचे उपाय करतांना जैविक किटकनाशकांचा वापर करावा. शेवटच्या आठवड्यात रांगडा कांद्याची लागवड करावी.

**आले**

- पुढील वर्षाच्या आले लागवडीसाठी योग्य बेण्याची निवड सप्टेंबर, ऑक्टोबर महिन्यातच पुर्ण करावी.
- या महिन्यात रोग विरहीत आले बेणे प्लॉटची पाहणी करावी व स्थानिक हवामानानुसार, जमिनीच्या मगदुरानुसार जाती निवडाव्यात.
- पाने गुंडाळणारी अळी पासून आले पिकाचे संरक्षण करावे. आले पिकावर ऑगस्टच्या शेवटच्या आठवडयापासून ते नोव्हेंबरच्या दुसऱ्या आठवडयापर्यत या किडींचा प्रादुर्भाव दिसून येतो. या किडीची अळी हिरवट रंगाची असून ती अंडयातून बाहेर पडल्यानंतर स्वतःच्या शरीराभोवती पान गुंडाळून घेते व आत राहून पाने खाते. किडीच्या प्रादुर्भाव दिसताच गुंडाळलेली पाने गोळा करुन नष्ट करावीत. तसेच ५% निंबोळी अर्क अथवा कार्बारील ४० ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यामध्ये मिसळून त्याची फवारणी करावी.

**पशुसंवर्धन**

- अस्वच्छतेमुळे स्तनदाह होवु नये यासाठी कासेची स्वच्छता ठेवावी.
- वादळी पावसाचे दिवस असल्याने जनावरांचे रक्षणासाठी नियोजन करावे. उच्च दाबाच्या विजेच्या तारा व वादळी विजेपासून रक्षणासाठी उपाय करावे.
- पावसामुळे गोठ्यातील वातावरणात आर्द्रता वाढते आणि जनावरे अस्वस्थ होतात. हे टाळण्याकरीता गोठयातील हवा खेळती राहील याची दक्षता घ्यावी.

**अवजारे**

**फुले मोल नांगर**

- क्षारपड व पाणथळ जमिनीतील अतिरिक्त पाण्याचा आणि क्षारांचा निचरा करण्यासाठी कमी खर्चात मोल निचरा पध्दती राबविण्यासाठी.
- मोल नांगराने मोल निचरा करण्यासाठी हेक्टरी रु. १५०० इतका खर्च येतो.
- मोल नांगर ६० ते ७२ एच.पी. ट्रॅक्टरद्वारे ओढता येतो.
- या यंत्राद्वारे दोन मोलमध्ये ४ मिटर अंतर ठेवल्यास प्रति तासाला ०.३ हेक्टर क्षेत्र करता येते.

**प्रकाशक** : **डॉ. गोरक्ष ससाणे**
संचालक, विस्तार शिक्षण
**प्रमुख संपादक** : **डॉ. पंडित खर्डे**
प्रभारी अधिकारी, प्रसारण केंद्र
**सहसंपादक** : **डॉ. सचिन सदाफळ**
सहाय्यक प्राध्यापक, प्रसारण केंद्र
**श्री. सुनिल राजमाने**
कनिष्ठ संशोधन सहाय्यक, प्रसारण केंद्र
**डिझाईनर** : **श्री. प्रदिप कोळपकर**
कलाकार तथा छायाचित्रकार, प्रसारण केंद्र
**श्री. सिध्दार्थ साळवे**
लिपीक–नि–टंकलेखक, प्रसारण केंद्र

**मफुकृवि विस्तार प्रकाशन क्र. २७५२/२०२४**